सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | सोमवार, दि. २८ सप्टेंबर २०२६ | वर्ष - ४ थे | अंक १६३ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com




# मातंग समाज मुंबईत धडकणार! 29 सप्टेंबरला महामोर्चा

**मुंबई :** अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाच्या मागणीसाठी मातंग समाजाकडून 29 सप्टेंबर रोजी मुंबईत महामोर्चा काढण्यात येणार आहे. राज्यभरातून सुमारे 5 लाख समाजबांधव मुंबईत दाखल होणार असल्याचा दावा आंदोलनाच्या आयोजकांनी केला आहे. आझाद मैदानावर हा मोर्चा होणार असून, शासन निर्णय जारी होईपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा इशारा देण्यात आला आहे.

अनुसूचित जातींच्या 13 टक्के आरक्षणाचे अ, ब, क, ड असे उपवर्गीकरण करण्याची मागणी मातंग समाजाकडून करण्यात येत आहे. यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने 1 ऑगस्ट 2024 रोजी उपवर्गीकरणाला घटनात्मक मान्यता देण्याचा मार्ग मोकळा केला होता. त्यानंतर महाराष्ट्र सरकारने या विषयाचा अभ्यास करण्यासाठी न्यायमूर्ती अनंत मनोहर बदर यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली. या समितीने 16 मार्च 2026 रोजी अहवाल सरकारकडे सादर केला.

मात्र, अहवालावर अद्याप अंतिम निर्णय झालेला नसल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला आहे. उपवर्गीकरणाच्या मागणीसाठी राज्यातील विविध भागांत आंदोलनं आणि मोर्चे काढण्यात आले असून, 29 सप्टेंबरच्या मुंबईतील मोर्चातून सरकारवर निर्णयासाठी दबाव आणण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. जूनमध्येही सकल मातंग समाजाच्या बैठकीत सरकारने निर्णय न घेतल्यास 29 सप्टेंबरला महामोर्चा काढण्याचा इशारा देण्यात आला होता. राज्यात मोठ्या प्रमाणावर सरकारी नोकरभरती होण्याची शक्यता असल्याने त्याआधी उपवर्गीकरण लागू करावे, अशी आंदोलकांची मागणी आहे. यामुळे आरक्षणातील लाभ अधिक वंचित घटकांपर्यंत पोहोचतील, असा त्यांचा दावा आहे. नाशिकसह विविध जिल्ह्यांतही अलीकडे या मागणीसाठी मोर्चे काढण्यात आले आहेत. या आंदोलनासाठी विविध मातंग नेते आणि सामाजिक संघटना एकत्र आल्या आहेत. आझाद मैदानावर मोठ्या संख्येने आंदोलक येणार असल्याने त्यांच्या वाहतूक, पाणी, वैद्यकीय सेवा आणि इतर मूलभूत सुविधांसाठी संबंधित प्रशासनाकडे व्यवस्था करण्याची मागणी करण्यात आली आहे.

# नेपाळमध्ये निसर्गाचा कोप; हिमलुंग हिमाल बेस कॅम्पवर भीषण हिमस्खलन, 10 जण बेपत्ता

**काठमांडू :** शेजारील नेपाळ देश सध्या तीव्र नैसर्गिक आपत्तीच्या विळख्यात सापडला आहे. पश्चिम नेपाळमधील तिबेट सीमेजवळ असलेल्या प्रसिद्ध 'हिमलुंग हिमाल' बेस कॅम्पवर रविवारी सकाळी एक भीषण हिमवादळ (Avalanche) कोसळले. या मानवनिर्मित नव्हे तर नैसर्गिक दुर्घटनेत किमान 10 जण बेपत्ता झाल्याची भीती वर्तवण्यात येत असून, प्रशासनाकडून युद्धपातळीवर माहिती घेतली जात आहे. पर्वतारोहण मोहिमेचे प्रमुख आयोजक मिंगमा ग्याल्जे शेर्पा यांनी या दुर्घटनेला दुजोरा दिला आहे. बेपत्ता झालेल्यांमध्ये त्यांच्या कॅम्पमधील दोन स्वयंपाकी कर्मचाऱ्यांचाही समावेश आहे. मिळालेल्या माहितीनुसार, रविवारी सकाळी अचानक हे हिमवादळ आले. हवामान विभागाने याआधीच खराब हवामानाचा इशारा दिला होता, ज्यामुळे अनेक पथकांनी सुरक्षितस्थळी माघार घेतली होती; मात्र काही जण अद्याप



बेस कॅम्पवरच थांबले होते.

सातत्यपूर्ण बर्फवृष्टीमुळे परिस्थिती गंभीर

मागील काही दिवसांपासून या पर्वतीय भागात सातत्याने मुसळधार बर्फवृष्टी होत आहे. परिणामी, अनेक पर्वतारोहकांना त्यांची शरद ऋतूमधील मोहीम मध्येच अर्धवट सोडत माघार घ्यावी लागली. बेपत्ता झालेले सर्व व्यक्ती विविध ट्रेकिंग आणि पर्वतारोहण कंपन्यांशी संबंधित असल्याचे समजते. मनांग जिल्ह्यातील 7,126 मीटर उंची असलेले हिमलुंग हिमाल हे शिखर हाय-अल्टीट्यूड ट्रेकिंगसाठी जगभरातील साहसी पर्यटकांमध्ये अत्यंत लोकप्रिय आहे. मात्र, येथील भौगोलिक परिस्थिती अत्यंत आव्हानात्मक मानली जाते. विशेष म्हणजे, या दुर्गम भागात हेलिकॉप्टर उड्डाणांसाठी विशेष परवानगी घ्यावी लागत असल्याने बचावकार्यात मोठे अडथळे निर्माण होत आहेत.

हवामानामुळे जनजीवन विस्कळीत

बंगालच्या उपसागरावर निर्माण झालेल्या तीव्र हवामान प्रणालीचा (Weather System) थेट परिणाम नेपाळवर झाला आहे. यामुळे पर्वतीय भागात प्रचंड बर्फवृष्टी होत असून मैदानी प्रदेशात मुसळधार पाऊस पडत आहे. गेल्या शुक्रवारपासून बिघडलेल्या हवामानामुळे अनेक रस्ते खराब झाले असून सुरक्षेचा उपाय म्हणून प्रशासनाने अनेक मार्ग वाहतुकीसाठी पूर्णपणे बंद केले आहेत.

**पर्यटकांना प्रशासनाचा सक्त इशारा :** परिस्थितीची गंभीरता पाहता, नेपाळ पर्यटन विभागाने हाय अलर्ट जारी केला आहे. ट्रेकर्स आणि पर्वतारोहकांना सर्व मोहिमा तातडीने थांबवून सुरक्षित स्थळी थांबण्याचे आवाहन करण्यात आले आहे. हवामान पूर्णपणे पूर्वपदावर येईपर्यंत पर्यटकांनी कोणत्याही साहसी उपक्रमांमध्ये सहभागी होऊ नये, असे निर्देश प्रशासनाने दिले आहेत. बेपत्ता झालेल्यांचा शोध घेण्यासाठी स्थानिक प्रशासन आणि बचाव पथकांचे प्रयत्न सुरू आहेत.

# लाडक्या बहिणींसाठी मोठी खुशखबर! ऑगस्टचा ₹1,500 हप्ता जमा होण्यास सुरुवात

**मुंबई :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी महिलांसाठी महत्त्वाची अपडेट समोर आली आहे. ऑगस्ट 2026 महिन्याचा ₹1,500 चा हप्ता रखडल्यामुळे लाभार्थी महिलांकडून पैसे कधी जमा होणार, असा प्रश्न उपस्थित केला जात होता. आता ऑगस्टच्या हप्त्यासाठी निधी वितरणाची प्रक्रिया सुरू झाली आहे. त्यामुळे पात्र महिलांच्या खात्यात पैसे टप्प्याटप्प्याने जमा होण्याची शक्यता आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत पात्र महिलांच्या आधार-संलग्न बँक खात्यात दरमहा ₹1,500 थेट लाभ हस्तांतरणाच्या माध्यमातून जमा केले जातात.

ऑगस्ट महिन्याचा हप्ता वेळेत जमा न झाल्याने गणेशोत्सवाच्या काळात लाभार्थी महिलांचे लक्ष या रकमेच्या प्रतीक्षेकडे लागले होते. आता शासनाकडून हप्त्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया पुढे सरकली आहे. त्यामुळे पात्र लाभार्थींना लवकरच त्यांच्या खात्यात ₹1,500 जमा झाल्याचा संदेश मिळू शकतो.

पैसे खात्यात आले की नाही, हे कसे तपासता येईल ?

हप्ता जमा झाल्याचा मोबाईलवर मेसेज आला नाही, तरी काही सोप्या पद्धतींनी खात्यात पैसे जमा झाले आहेत की नाही हे तपासता येईल.

बँकेच्या कस्टमर केअरवर संपर्क करून खात्यातील शिल्लक तपासा.

मोबाईल बँकिंग किंवा इंटरनेट बँकिंगमधून बँक स्टेटमेंट तपासा.

बँकेच्या ॲपमध्ये खात्यातील व्यवहार पाहा.

जवळच्या बँक शाखेत जाऊन खात्यात ₹1,500 जमा झाले आहेत का, याची खात्री करा.

दरम्यान, योजनेशी संबंधित कोणतीही लिंक किंवा अनोळखी संदेशावर क्लिक करण्याऐवजी अधिकृत महाराष्ट्र शासनाच्या पोर्टलवरूनच माहिती तपासण्याचा सल्ला देण्यात आला आहे.



## माजलगाव शिक्षक पतसंस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहा - चेअरमन रमेश फपाळ



**माजलगाव, दि. 24 प्रतिनिधी :** माजलगाव तालुका शिक्षक सहकारी पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, २७ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता जि. प. कन्या प्रशाला, माजलगाव येथे आयोजित करण्यात आली आहे. या सभेस संस्थेच्या सर्व सभासद शिक्षक बंधू भगिनींनी आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन संस्थेचे चेअरमन रमेश फपाळ, उपाध्यक्ष विठ्ठल आरबे, सचिव नितीन काळे, खजिनदार नारायण झोडगे व सर्व संचालक मंडळाने केले आहे.

दरवर्षीप्रमाणे यंदाही संस्थेच्या वतीने गुणवंत विद्यार्थी, आदर्श शिक्षक, सेवानिवृत्त शिक्षक तसेच तालुक्यातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शिक्षकांचा गौरव गटशिक्षणाधिकारी कल्पेश दळवी यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. तरी सर्व शिक्षकांनी उपस्थित राहावे असे आवाहन उमाकांत सोळंके, परमेश्वर शिंदे, भास्कर शिंदे, बालासाहेब काळे, शेख जाहीर, संजय कुलकर्णी, महेश खुणे, बंडू गायकवाड, शरद नायबळ, समाधान शिंदे, सुंदर राठोड, श्रीमती भावना चौधरी, लता रत्नापुरकर यांनी केले आहे.

# बीड उपविभागात 'महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम 2026' अंतर्गत एक दिवसीय प्रशिक्षण संपन्न

## अध्यक्षस्थानी उपविभागीय कृषी अधिकारी उद्धव गरजे; भूमीहीन, एकल व विधवा महिलांना शेतकरी दर्जा मिळवून देण्यावर भर

**बीड, प्रतिनिधी :** 'महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम २०२६' ची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी व्हावी, या उद्देशाने उपविभागीय कृषी अधिकारी कार्यालय, बीड यांच्या वतीने शुक्रवारी (दि. २४ सप्टेंबर) डी. पी. डी. सी. सभागृह, बीड येथे एक दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

संयुक्त राष्ट्र संघाने २०२६ हे वर्ष 'आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष' म्हणून घोषित केले आहे. या अनुषंगाने 'महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम २०२६' हे विधेयक पारित करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे. या पार्श्वभूमीवर, उपविभागीय कृषी अधिकारी श्री. उद्धव गरजे यांच्या अध्यक्षतेखाली हे प्रशिक्षण पार पडले. आपल्या प्रास्ताविक भाषणात त्यांनी या अधिनियमाच्या महत्त्वावर तसेच 'सेवा संकल्प अभियाना'वर सविस्तर मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमात प्रवीण प्रशिक्षक म्हणून उपकृषी अधिकारी बीड श्री. राजेंद्र राऊत आणि उपकृषी अधिकारी आष्टी श्री. संदीप चाकणे उपस्थित होते. श्री. संदीप चाकणे यांनी महिला शेतकरी म्हणजे काय, अधिनियमानुसार शेतीची व्याख्या, तसेच १८ वर्षे वय पूर्ण झालेल्या, महाराष्ट्राच्या रहिवासी



असलेल्या आणि शेतीशी निगडित कोणतेही काम करणाऱ्या भूमीहीन महिला शेतमजूर, एकल महिला, विधवा व परित्यक्ता महिलांना ग्रामसभेमार्फत 'महिला शेतकरी' म्हणून सन्मान व प्रमाणपत्र देण्यासाठीचे निकष सखोलपणे समजावून सांगितले.

उपकृषी अधिकारी श्री. राजेंद्र राऊत यांनी महिला शेतकरी प्रमाणपत्र मिळवण्याची संपूर्ण प्रक्रिया विशद केली. यात सहाय्यक कृषी अधिकारी, कृषी अधिकारी आणि तालुका कृषी अधिकारी यांच्या जबाबदाऱ्या व भूमिकेबाबत मार्गदर्शन केले. प्रमाणपत्र मिळाल्यानंतर महिलांना मिळणारे विविध लाभ, 'गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजने'चा फायदा यावर प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून चर्चा घडवून आणण्यात आली.

सांघिक खेळ, गट चर्चा, चित्रीकरण आणि सादरीकरणाच्या माध्यमातून प्रशिक्षणार्थ्यांसमोर अधिनियमाचे महत्त्व पटवून देण्यात आले. यावेळी मंडळ कृषी अधिकारी नेकनूर/बीड श्री. कल्याण अंबुरे, मंडळ कृषी अधिकारी शिरूर श्री. कृष्णा नागरगोजे आणि सहाय्यक कृषी अधिकारी आष्टी श्रीमती पोकळे मॅडम यांनी सादरीकरण करून या कायद्याचा महिलांना कसा लाभ होऊ शकतो, हे स्पष्ट केले.

या प्रशिक्षण कार्यक्रमाला तालुका कृषी अधिकारी बीड, पाटोदा, आष्टी आणि शिरूर कासार येथील मंडळ कृषी अधिकारी, उपकृषी अधिकारी, सहाय्यक कृषी अधिकारी, कृषी सेवक व समूह सहाय्यक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन उपकृषी अधिकारी श्री. अर्जुन चव्हाण यांनी केले. संपूर्ण प्रशिक्षण अत्यंत खेळीमेळीच्या आणि उत्साही वातावरणात पार पडले. हे आयोजन यशस्वी करण्यासाठी उपविभागीय कृषी अधिकारी कार्यालय बीड येथील उपकृषी अधिकारी श्री. संदीप वाघुले यांच्यासह सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## दुष्काळ जाहीर करुन,चारा छावण्या व मदत जाहीर करा अन्यथा अमरण उपोषण : रोहन गलांडे



**केज/प्रतिनिधी :** केज तालुक्यात दुष्काळ जाहीर करुन,चारा छावण्या व दुष्काळी मदत जाहीर पंधरा दिवसात सरकारने जाहीर करावी व शेतकऱ्यांना दिलासा द्यावा अन्यथा ५/१०/२०२६ रोजी चिंचोली माळी येथे अमरण उपोषण करणार असा इशारा निवेदनाद्वारे रोहन गलांडे पाटील यांनी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन व सरकारला दीला आहे .या विषयी निवेदनाद्वारे सविस्तर वृत्त असे की केज तालुक्यात दुष्काळ जाहीर करुन,चारा छावण्या व दुष्काळी मदत पंधरा दिवसात सरकारने जाहीर करावी व शेतकऱ्यांना दिलासा द्यावा अन्यथा ५/१०/२०२६ रोजी केज तालुक्यातील चिंचोली माळी येथे श्री संत नामदेव महाराज सभागृह येथे अमरण उपोषण करणार असा इशारा निवेदनाद्वारे रोहन गलांडे पाटील यांनी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन व सरकारला दिला आहे कारण केज तालुक्यातील पशुपालक, शेतकरी चिंताग्रस्त झाले आहेत कारण पाऊस नाही पडल्यांने शेतकऱ्यांचा पशुचा खुप मोठा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे त्यामुळे वरील विनंती सरकारने मान्य कराव्यात अशी मागणी निवेदनाद्वारे रोहन गलांडे पाटील यांनी केली आहे .

# पूर्णवादी बँकेची 42 वी वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न - सभासदांना 6% लाभांश घोषित






**बीड :** पूर्णवादी नागरिक सहकारी बँकेची 42 वी वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक 27/09/2026 रोजी वृंदावन गार्डन, बीड येथे बँकेचे अध्यक्ष डॉ. सुभाष काशिनाथराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. वार्षिक सर्वसाधारण सभेचा प्रारंभ दिप प्रज्वलन व प.पू. डॉ रामचंद्र महाराज पारनेरकर, प.पू. डॉ. विष्णु महाराज पारनेरकर तसेच भारत माता यांच्या प्रतिमा पुजनाने झाला. सभेच्या नोटीसचे वाचन बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. राजेश कुलकर्णी यांनी केले. तसेच या प्रसंगी त्यांनी बँकेचा सन 2025-26 या आर्थिक वर्षाचा ताळेबंद व नफा तोटा पत्रकाचे सभेसमोर वाचन केले. यानंतर बँकेचे अध्यक्ष डॉ सुभाष जोशी यांनी वार्षिक अहवालाचे वाचन करून बँकेच्या आर्थिक स्थितीचा आढावा सभेसमोर मांडताना सांगितले की, बँकेने 41 वर्षांचा कालखंड पार करीत 42 व्या वर्षात यशस्वी पदार्पण केले असून 31 मार्च 2026 अखेर बँकेच्या एकुण ठेवी रू. 961 कोटी एवढ्या तर कर्जे रू. 568.95 कोटीची असून बँकेचा एकूण व्यवसाय हा रू. 1530 कोटी झालेला आहे. अहवाल वर्षात बँकेस रू. 4 कोटी 6 लाख इतका निव्वळ नफा झाला असून या वर्षी सभासदांना 6% लाभांश घोषित केला आहे. नेट एनपीए चे प्रमाण 0.62% इतके आहे तर बँकेचा CRAR 13.52% इतका आहे. बँकेचा पारदर्शक व्यवहार आणि ग्राहक व सभासदांनी बँकेवर दाखवलेला विश्वास यामुळेच बँकेची उत्तरोत्तर प्रगति होत असताना दिसून येते. व्यवसाय वृद्धीसाठी मागील वर्षभरात बँकेच्या 7 शाखांमध्ये ग्राहक मेळावे आयोजित केले गेले. या मेळाव्यांमधून ग्राहकांनी व सभासदांनी तसेच नवीन हितचिंतकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवून पूर्णवादी बँकेवरील स्नेह प्रकट केला. सर्व सभासदांना व ग्राहकांना संपर्क करण्यासाठी दिवाळी भेट कार्ड, तसेच बँकेची दिनदर्शिका, विविध कर्ज व ठेवी योजनांची माहिती देणारी पत्रके प्रकाशित करून बँकेची माहिती ग्राहक व संभासदांपर्यंत पोहचवण्यात आली. तसेच आजच्या या स्पर्धेच्या युगात ग्राहकांना कमी व्याजदरामध्ये कर्ज कसे उपलब्ध करून देता येईल या साठी बँकेने विविध कर्ज योजना सुरु केल्या आहेत. त्याचप्रमाणे मागील आर्थिक वर्षात आष्टी, कडा व परभणी येथील बँकेच्या शाखा ग्राहकांना शाखेत ये – जा करण्यास सोयीच्या व प्रशस्त नवीन जागेत स्थलांतरित केल्या या प्रसंगी अध्यक्षांनी सर्व सभासदांना किमान दहा हजार रुपयांचे जास्तीचे शेअर्स घेऊन बँकेचे भाग भांडवल वाढवण्यासाठी मदत करण्याची विनंती केली ज्यामुळे बँकेच्या लो व्हॅल्यू लोन्स ची मर्यादा वाढवता येईल तसेच ते म्हणाले की, सर्व सभासद व ग्राहक यांच्या सहकार्याने बँकेस शेड्यूल्ड बँकेचा दर्जा प्राप्त करून देण्याचा संचालक मंडळाचा मानस आहे.

तसेच बँकेचे उपाध्यक्ष डॉ. लक्ष्मीकांत पारनेरकर यांनी मनोगत व्यक्त करतांना असे म्हणले की, सर्व सभासदांच्या सहकार्याने व प. पू. श्री विष्णु महाराज पारनेरकर यांच्या आशीर्वादाने बँक नक्कीच उत्तरोत्तर प्रगती करीत राहील असे मत व्यक्त केले. यानंतर बँकेचे सभासद प्रा. किशोर काळे व श्री सुलेख कलंत्री यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

सभेचे औचित्य साधून बँकेच्या सभासदांच्या व कर्मचारी पाल्यांचा त्यांनी 2026 च्या शालांत परीक्षेत मिळवलेल्या यशाबद्दल गौरविण्यात आले. यामध्ये बँकेचे सभासद श्री. राजेश्वर सुर्यवंशी यांचा मुलगा चि. भैरवनाथ याचा तर कर्मचारी श्री गोवर्धन सानप यांचा मुलगा चि. जयदीप यांचा समावेश होता. तसेच या प्रसंगी बँकेचे कर्मचारी यांच्या पाल्यांनी प्रोफेशनल पदवी प्राप्त केल्या बद्दल सन्मानित करण्यात आले त्यामध्ये डॉ. स्नेहल सुधाकर कुलकर्णी MBBS व श्री. सोहम संदीप इनामदार CA यांचा समावेश होता.

सभेचे सुत्र संचलन बँकेचे सरव्यवस्थापक श्री महेश पारगांवकर यांनी केले तर आभार प्रदर्शन बँकेचे संचालक डॉ. आनंद वैद्य यांनी केले.याप्रसंगी पूर्णवादी बँकेचे अध्यक्ष डॉ. सुभाष जोशी, बँकेचे उपाध्यक्ष डॉ लक्ष्मीकांत पारनेरकर, तसेच संचालक श्री सुहास तेंडूलकर, डॉ. आनंद वैद्य, डॉ. विवेक पालवनकर, डॉ. सौ सुरेखा देशमुख, सौ. जयश्री रायते, डॉ. सुरेंद्र कलंत्री, श्री महादेव हुलजुते, श्री विश्वंभर थिगळे, श्री ज्योतीश्वर भालेराव, बँकेचे तज्ञ संचालक सीए श्री गोपाल कासट, तसेच बँकेच्या बोर्ड ऑफ मॅनेजमेंटचे अध्यक्ष सीए. श्री. एस.पी. लड्डा व सदस्य ॲड. मिलींद वाघीरकर हे उपस्थित होते.तसेच या सभेस विशेषत्वाने बँकेचे माजी संचालक ॲड. अमृतराव पाठक, श्री सुभाष क्षीरसागर, श्री विजयकुमार मुसळे, श्री दत्तात्रय अदवंत, तसेच ॲड. कालिदास नाना थिगळे, ॲड. विजयकुमार देशपांडे, श्री नितीन कोटेचा, श्री राजेंद्र मुनोत, श्री सुनील कोटेचा, श्री ओम सारडा, श्री विष्णुदास बियाणी, श्री दायमा सेठ, श्री भारत शेटे, डॉ. घोळवे, श्री विनायक महाराज पाटांगणकर, डॉ. सौ. सीमाताई जोशी, श्री चंद्रकांत मुळे, श्री बालाजी पवार, श्री विजेंद्र चौधरी, श्री नारायण धांडे, डॉ. साहेबराव भोपळे, श्री अमरीश रायते, श्री जयप्रकाश कलंत्री, श्री शामसेठ आहुजा, श्री गणेश भंडारे पत्रकार श्री महेश वाघमारे, श्री दिलीप खिस्ती, श्री सुनील क्षीरसागर, श्री प्रमोद कुलकर्णी, श्री रामचंद्र जोशी, श्री अभय पटवारी तसेच श्री मायकर, श्री अनिल घुमरे, श्री तौर रोहिदास, श्री सचिन कुलकर्णी, ई. मान्यवर सभसद उपस्थित होते.

## आ. नमिताताई मुंदडा यांनी चिंचोलीमाळी शिवारात बांधावर जाऊन केली दुष्काळाची पाहणी



**केज/प्रतिनिधी :** केज विधानसभा मतदार संघाच्या आमदार नमिताताई मुंदडा यांनी शुक्रवारी सकाळी चिंचोलीमाळी शिवारात शेताच्या बांधावर जाऊन पावसा अभावी निर्माण झालेल्या कोरड्या दुष्काळी परिस्थितीची पाहणी केली.यावेळी त्यांनी चिंचोलीमाळी येथील शेतकऱ्यांशी संवाद साधून आवश्यक मदत मिळवून देण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करणार असल्याचे सांगून शेतकऱ्यांना धीर आणि दिलासा दिला.

पावसा अभावी निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी केजच्या आमदार नमिता मुंदडा या शुक्रवारी सकाळी साडे नव वाजता चिंचोलीमाळी शिवारातील शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन नुकसान झालेल्या पिकांची प्रत्येक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या पिकांचे झालेले नुकसान, पाण्याची उपलब्धता व सध्या निर्माण झालेल्या अडचणींची सविस्तर माहिती जाणून घेतली.यावेळी त्यांच्या समवेत तालुका कृषी अधिकारी सागर पठाडे,मंडळ, अधिकारी दयानंद मस्के, मंडळ कृषी अधिकारी कोठावळे, ग्राम महसूल अधिकारी धनाजी क्षीरसागर,कृषी सहाय्यक रिंकल पवार, ग्रामपंचायत अधिकारी अनिता जाधव, पोलीस पाटील रेखा माळी - चिंचोलकर ,चेअरमन अरुणतात्या काळे, उपसरपंच धिरज वनवे, यांच्या सह ग्रामस्थ व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कौशल्यविकासातून रोजगारनिर्मितीवर भर ,जन शिक्षण संस्थान बीडचा दोन दिवसीय क्षमता बांधणी कार्यक्रम संपन्न




**बीड :** कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय, भारत सरकारद्वारा संचलित जन शिक्षण संस्थान बीडच्या वतीने अधिकारी, प्रशिक्षक, प्रशिक्षिका व प्रशिक्षणार्थी यांच्या कौशल्यविकासाच्या उद्देशाने दोन दिवसीय क्षमता बांधणी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. दीनदयाल शोध संस्थानचे बीड प्रकल्प प्रमुख डॉ. उपेंद्रजी कुलकर्णी यांच्या संकल्पनेतून आयोजित हा कार्यक्रम २२ व २३ सप्टेंबर २०२६ रोजी संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी जन शिक्षण संस्थान बीडच्या उपाध्यक्ष डॉ. सत्यभामा चोले अध्यक्षस्थानी होत्या. प्रमुख मार्गदर्शक डॉ. राजेंद्रजी हुंबे, डॉ. वीणा हुंबे, सौ. संध्याताई कुलकर्णी, डॉ. सीमाताई जोशी तसेच संचालक श्री. गंगाधरजी देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविकात श्री. देशमुख यांनी प्रशिक्षणातून मिळणारे ज्ञान व कौशल्ये प्रत्यक्ष कार्यात प्रभावीपणे वापरण्याचे आवाहन केले.


पहिल्या दिवशी डॉ. राजेंद्रजी हुंबे यांनी संवाद कौशल्य व सॉफ्ट स्किल्स, डॉ. वीणा हुंबे यांनी विपणन व्यवस्थापन, सौ. संध्याताई कुलकर्णी यांनी उत्पादनाची गुणवत्ता व वाढ, तर लीड बँकेचे मॅनेजर श्री. सचिनजी गांगुर्डे यांनी कर्जविषयक शासकीय योजना व अर्थसहाय्य याबाबत मार्गदर्शन केले. यावेळी प्रधानमंत्री स्वयंरोजगार योजना, मुख्यमंत्री स्वयंरोजगार कार्यक्रम, पीएम विश्वकर्मा, स्टँड अप इंडिया तसेच संत रोहिदास चर्मकार महामंडळाच्या योजनांची माहिती देण्यात आली.

## स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालयात पंडित दीनदयाल उपाध्याय यांची जयंती साजरी



बीड (प्रतिनिधी) दि. 25 सप्टेंबर 2026 रोजी भारतीय जनसंघाचे नेते व एकात्म मानववादाचे प्रणेते पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या जयंती निमित्त स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालय, बीड येथे त्यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर डॉ. सुहास मोराळे यांच्या हस्ते प्रतिमापूजन करून अभिवादन करण्यात आले.या कार्यक्रमाचे नियोजन महाविद्यालयातील वेबसाईट समितीच्या अंतर्गत करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रोफेसर डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, प्रोफेसर डॉ. रमेश खंडागळे, वेबसाईट समिती प्रमुख प्रा. भार्गवराम चौधरी, आजीवन व शिक्षण विस्तार विभागाचे प्रमुख प्रोफेसर डॉ. देविदास नागरगोजे, संगणक शास्त्र विभाग प्रमुख प्रा. संजय काळे उपस्थित होते.तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. पंडित दीनदयाल जी उपाध्याय यांच्या विचारांचे स्मरण करून त्यांच्या राष्ट्रसेवा, सामाजिक समरसता आणि एकात्म मानववादाच्या विचारांना अभिवादन करण्यात आले.

## बीड जिल्हा दुष्काळग्रस्त जाहीर करून सर्व सवलती लागू करा : ज्येष्ठ नागरिकांची मागणी



**गेवराई प्रतिनिधी :** श्री जगदंबा ज्येष्ठ नागरिक सेवाभावी संस्था, गेवराई व ग्राहक पंचायत महाराष्ट्र, बीड जिल्हा यांच्या वतीने बीड जिल्हा दुष्काळग्रस्त जाहीर करून शेतकऱ्यांना सर्व सवलती लागू कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे.

याबाबत तहसील कार्यालयातील महसूल सहाय्यक अधिकारी सौ. सपना सपकाळ यांना संस्थेचे अध्यक्ष अनिल बोर्डे व त्यांच्या सहकाऱ्यांनी प्रत्यक्ष भेटून निवेदन दिले.

निवेदनात पुढील मागण्या करण्यात आल्या आहेत -

लग्न, उत्सव व मिरवणुकांमध्ये डीजे च्या कर्णकर्कश आवाजामुळे ज्येष्ठ नागरिक, लहान मुले, रुग्ण व विद्यार्थ्यांच्या शारीरिक व मानसिक आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे. तरी जिल्ह्यात डीजेवर कायमस्वरूपी बंदी आणावी.

गेवराईसह बीड जिल्ह्यात सणासुदीच्या व दैनंदिन काळात वारंवार विद्युत पुरवठा खंडित होत आहे. यामुळे सर्वसामान्य नागरिक, लहान व्यावसायिक व शेतीपंपधारक शेतकऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. तरी महावितरण विभागाने योग्य उपाययोजना करून अखंडित व सुरळीत विद्युत पुरवठा करावा.

गेवराई शहरात वाहतुकीचा खोळंबा होऊन अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. तरी शहरात कायमस्वरूपी वाहतूक नियोजन होणे आवश्यक आहे. एसबीआय, गेवराई शाखेत ज्येष्ठ नागरिकांना ताटकळत उभे राहावे लागते. सणासुदीच्या काळात हा त्रास अधिक वाढतो. तरी ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र काउंटरची व्यवस्था करावी.

तसेच बीड ते पुणे रेल्वे सेवा सुरू झाली असल्याने गेवराई बस स्थानकातून बीड रेल्वे स्थानकापर्यंत बस सेवा तातडीने सुरू करावी, अशी मागणीही करण्यात आली.

## योगेश्वरी पॉलिटेक्निकमध्ये करिअर मार्गदर्शनासाठी विशेष सेमिनार




**अंबाजोगाई :** योगेश्वरी शिक्षण संस्था संचलित कृष्णाजी पुरुषोत्तम चौसाळकर योगेश्वरी पॉलिटेक्निक, अंबाजोगाई येथे विद्यार्थ्यांच्या करिअर मार्गदर्शनासाठी "Future Trends in Mechanical Engineering" या विषयावर विशेष सेमिनारचे आयोजन करण्यात आले होते.

या सेमिनारसाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून सौ.मीनाक्षी कुलकर्णी (Retd.General Manager, BOSCH India, Nashik) उपस्थित होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांना Mechanical Engineering क्षेत्रातील बदलते स्वरूप, भविष्यातील तंत्रज्ञान, उद्योग क्षेत्रातील अपेक्षा, आवश्यक कौशल्ये आणि Career Development याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. रमण देशपांडे यांनी केले. यावेळी योगेश्वरी शिक्षण संस्थेचे सचिव श्री. कमलाकर काका चौसाळकर, संचालक श्री. प्रताप पवार, संचालिका ॲड. कल्याणी विर्धे, प्रा.श्री. एन. के. गोळेगावकर , श्री. रमण सोनवळकर, उद्योजक श्री. अमोद कुलकर्णी, डॉ. वैशाली कुलकर्णी, डॉ.जान्हवी कुलकर्णी यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापकवृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन यंत्र अभियांत्रिकी विभागप्रमुख प्रा. शाम गडदे यांनी केले, तर आभार प्रदर्शन ऑटोमोबाईल अभियांत्रिकी विभागप्रमुख प्रा. बप्पासाहेब सोनवणे यांनी केले.

# नैतिक अधिष्ठान असलेला समाज निर्माण केल्याशिवाय स्वातंत्र्याला कसलाच अर्थ नाही - डॉ.राजेश इंगोले

**अंबाजोगाई :** शालेय विद्यार्थ्यांवर नैतिक मूल्य असलेले विचार संस्कार दिले तरच नैतिक अधिष्ठान असलेला समाज निर्माण होईल आणि हा नैतिक अधिष्ठान असलेला समाज नैतिक मूल्य असलेल्या राष्ट्राची उभारणी करू शकेल आणि हे नैतिक मूल्य जपणारे राष्ट्र हे महासत्ता बनेल त्यामुळे नैतिक अधिष्ठान असलेली समाज रचना राष्ट्रासाठी खूप गरजेचे आहे त्याशिवाय मिळालेल्या स्वातंत्र्याला कसलाच अर्थ प्राप्त होणार नाही अशी प्रतिपादन सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांनी केले.

येथील स्वामी विवेकानंद विद्यालयात ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. यावेळी विचारमंचावर क्षितिज बहुउद्देशीय प्रतिष्ठानचे अध्यक्ष संतोष कुलकर्णी तसेच सुप्रसिद्ध बालरोग तज्ञ अखिलेश अंजान यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी डॉ.राजेश इंगोले यांच्या हस्ते सर्व महापुरूषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. पुढे बोलताना डॉ.इंगोले यांनी विद्यार्थी हा सभोवतालचे वातावरण तसेच आपल्या सभोवताली असणाऱ्या व्यक्तींचे वागणे, बोलणे हे निरीक्षणाने शिकत असतो. त्यानुसार त्याची व्यक्तिमत्व घडत असते. विद्यार्थ्यांच्या सभोवताली संस्कृत व्यक्ती असेल योग्य आचरण करणारे वातावरण असेल योग्य संस्कृती असेल तर त्या विद्यार्थ्याचे व्यक्तिमत्व हे संस्कारी सर्जनशील बनते. त्यामुळे नैतिक मूल्य असणारे विचार जर विद्यार्थ्यांच्या बाल मनात त पेरले गेले तर नैतिक अधिष्ठान असलेली समाज रचना निर्माण होईल ही नैतिक अधिष्ठान असलेली समाज रचना भारताला नैतिक राष्ट्र बनवेल आणि नैतिक दृष्ट्या संपन्न असलेला देश हा महासत्ता बनत असतो. त्यामुळे या वयात योग्य संस्कार मिळणे गरजेचे आहे हे डॉ.राजेश इंगोले यांनी निक्षून सांगितले. पालकांनीही केवळ आपला पाल्य शाळेत सोडला म्हणजे आपले कर्तव्य संपले असे मानण्याची कारण नाही आपल्या घरी ही आपल्याला आपल्या पाल्यांवर योग्य संस्कार कसे देता येतील याकडे लक्ष दिले पाहिजे. आपल्या पाल्याला आपण एखादी गोष्ट सांगत असताना आपण त्या गोष्टीचे काटेकोरपणे पालन करत आहोत का नाही हे तपासणी गरजेचे असते कारण मुलांना असे करा




असे करू नका हे सांगण्यापेक्षा जर आपण कृतीतून ती गोष्ट प्रत्यक्षात उतरवली तर त्याचा परिणाम जास्त असतो. मुलांच्या जडणघडणीमध्ये पालकांसोबतच शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. आई ही मुलाची पहिली शाळा असते आणि शाळा ही मुलांची दुसरी आईत असते या वाक्यात या दोन्ही घटकांचे महत्त्व अधोरेखित केले आहे असेही डॉ.राजेश इंगोले यांनी सांगितले. तर यावेळी डॉ.इंगोले यांनी विविध उदाहरणे देत चांगल्या सवयी व वाईट सवयी याचे स्पष्टीकरण केले. आपल्या पाल्यांना मोबाईल, टी.व्ही तसेच अन्य वाईट सवयींपासून दूर कसे ठेवावे याची माहिती डॉ.इंगोले यांनी उपस्थित पालकांना शिक्षकांना व विद्यार्थ्यांना दिली. पालकांनी आपल्या मुलांचे सुप्त गुण ओळखून त्याला त्या क्षेत्रात त्याचे ध्येय कशी साध्य करता येईल यासाठी काही मार्गदर्शक सूचना केल्या. यावेळी उपस्थित पालकांनी डॉ.राजेश इंगोले यांना मुलांच्या अभ्यास विषयक तसेच वर्तणूक विषयक समस्या याबाबत प्रश्न विचारून त्यांचे शंका निरसन करून घेतले. यावेळी अखिलेश अंजान यांनी मुलांनी निरोगी कसे राहावे याकरिता सखोल मार्गदर्शन केले. संस्थेचे अध्यक्ष संतोष कुलकर्णी यांनी मुलांच्या अभ्यासाबरोबरच त्यांच्या व्यक्तिमत्त्वांमध्ये विकास घडवून आणण्यासाठी संस्थेतर्फे विविध उपक्रम राबविले जातात त्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वात अमुलाग्र बदल होतो असे सांगितले. मुलांना ध्येयाकडे नेण्यासाठी संस्थेचे सर्व शिक्षक अहोरात्र प्रयत्न करतात ही संस्थेच्या दृष्टीने अभिमानाची गोष्ट आहे असे सांगत विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनामध्ये सकारात्मक बदल घडून आणण्यासाठी प्रयत्न करावेत असे आवाहन केले. यावेळी शालेय विद्यार्थ्यांनी विविध कलाविष्कार सादर करत आपल्या कला सादर केल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आश्विनी गिरी यांनी केले तर आभार अंकिता कुलकर्णी यांनी मानले.

उपविभागीय कार्यालय : आदर्श नगर, गणपती मंदिराजवळ, पांगरी रोड, बीड. मो. 9403264930, ई-मेल - jagannathdeshmukh2020@gmail.com

Solapur Tarun Bharat

सोलापूर तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | सोमवार, दि. २८ सप्टेंबर २०२६ | वर्ष - ४ थे | अंक १६३ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## जगप्रसिद्ध अजिंठा लेणीत पर्यावरण पुरक - ई - बससेवा सुरु करा परिवाहन मंत्री यांना दिले निवेदन



तभा.वृत्तसेवा

**सोयगांव,दि.२७ सप्टेंबर :** जगप्रसिद्ध अजिंठा लेणी बघण्यासाठी देश - विदेशातून मोठ्या संख्येने पर्यटक येत असतात. टि पॉइन्ट ते लेणी पर्यटकांना येणे - जाण्यासाठी प्रदुषण विरहित बस सेवा अवशक्य असतांना परिवहन मंडळाच्या वतीने साधी बस सेवा सुरु आहे. या संदर्भात भाजप युवा मोर्चा चे जिल्हा उपाध्यक्ष अजय पाटील यांनी मुंबई येथे राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची भेट घेऊन अजिंठा लेण्यांत प्रदुषण विरहित ई ( शिवाई बससेवा ) सुरु करण्यात यावी. बस चे चार्जिंग स्टेशन सोयगांव बस आगारात उभारण्यात यावे. सोयगांव बस आगाराची जागा मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे. नवीन बस स्थानक उभारण्यात यावे, तसेच सुरत , कल्याण, अकोला, परभणी, नंदुरबार ही लांब पल्याची बस सेवा सोयगांव आगाराच्या वतीने चालविण्यात यावी, सोयगांव आगाराला नविन बस गाड्या देण्यात यावे तसेच छत्रपती संभाजीनगर ते जळगाव मार्गावर चालविण्यात येणाऱ्या शिवाई बसला फर्दापूर, अजिंठा लेणी या स्टॉपवर थांबा नाही त्यामुळे पर्यटकांची गैरसोय होत आहे. त्याबद्दल सविस्तर चर्चा करून परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांना भाजप युवा मोर्चा चे जिल्हा उपाध्यक्ष अजय पाटील यांनी निवेदन दिले.

# जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची 43 वी वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न

## 21 कोटींचा निव्वळ नफा; 3493 कोटींच्या ठेवी — विविध कर्जांचे व्याजदर घटविले

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची ४३ वी अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवारी (दि. २६) बँकेच्या मुख्यालयातील चौथ्या मजल्यावरील सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. ग्रामीण व शहरी भागातील सभासदांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहत सभेत सहभाग नोंदविला.

सभेच्या प्रारंभी बँकेचे कार्यकारी संचालक अजय मोटे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी त्यांनी बँकेच्या प्रगतीचा आढावा घेत आर्थिक स्थिती तसेच विषयपत्रिकेचे वाचन केले. अध्यक्षीय भाषणात बँकेचे अध्यक्ष आमदार विलास भुमरे यांनी सन २०२५-२६ या आर्थिक वर्षातील बँकेच्या कामकाजाची माहिती सभासदांसमोर मांडली.

सन २०२५-२६ मध्ये बँकेला २१ कोटी रुपयांचा निव्वळ नफा झाला असून बँकेच्या एकूण ठेवी ३ हजार ४९३ कोटी रुपये आहेत. बँकेचा नेट एनपीए ७.९८ टक्के असल्याची माहिती भुमरे यांनी दिली.



सभेत बँकेने विविध कर्जांच्या व्याजदरात कपात केल्याची माहितीही देण्यात आली. सोनेतारण कर्जाचा व्याजदर १३ टक्क्यांवरून ११ टक्के करण्यात आला आहे. गृहकर्ज व वाहन कर्जाचा व्याजदर ११.७५ टक्क्यांवरून ११ टक्के करण्यात आला. वैयक्तिक कर्जाचा व्याजदर १३ टक्क्यांवरून १२ टक्के करण्यात आला असून, त्याची प्रक्रिया शुल्क एक टक्क्यावरून अर्धा टक्का करण्यात आली आहे. बँकेचा नफा वाढविण्यासाठी संचालक मंडळ व कर्मचारी सातत्याने प्रयत्न करतील, असेही भुमरे यांनी सांगितले.

शेतकऱ्यांच्या थकीत कर्जाच्या प्रश्नावर बोलताना भुमरे यांनी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर कर्जमाफी योजना लागू केल्याबद्दल मुख्यमंत्री तसेच दोन्ही उपमुख्यमंत्र्यांचे आभार मानले. योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांना नवीन कर्जवाटप करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.यावेळी मंत्री अतुल सावे यांनी महाराष्ट्रात दुष्काळ जाहीर करण्यात आला असून छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सर्व तालुक्यांचा त्यात समावेश असल्याचे सांगितले. शेतकऱ्यांना अपेक्षेपेक्षा अधिक मदत देण्याबाबत मंत्रिमंडळाचा विचार असल्याचे त्यांनी नमूद केले.

बँकेचे संचालक खासदार कल्याण काळे यांनी शेतकऱ्यांना शासनाकडून प्रतिएकर ७५ हजार रुपये आर्थिक मदत देण्याची मागणी केली. सभेच्या शेवटी बँकेचे उपाध्यक्ष रामराव शेळके यांनी उपस्थितांचे आभार मानले. राष्ट्रगीतानंतर सभेची सांगता झाली.

सभेस अध्यक्ष आमदार विलास भुमरे, उपाध्यक्ष रामराव शेळके, मंत्री अतुल सावे, खासदार कल्याण काळे, माजी मंत्री अब्दुल सत्तार, आमदार रमेश बोरनारे, आमदार रंजनाताई जाधव यांच्यासह संचालक मंडळातील सदस्य उपस्थित होते. तसेच बँकेचे कार्यकारी संचालक अजय मोटे, सरव्यवस्थापक अण्णासाहेब वडेकर, कर्मचारी प्रतिनिधी एस. वाय. डकले, सर्व व्यवस्थापक, विभागप्रमुख, कर्ज अधिकारी, लेखा अधिकारी, अधिकारी-कर्मचारी आणि जिल्ह्यातील मोठ्या संख्येने सभासद उपस्थित होते.

## एमजीएममध्ये राष्ट्रीय लघुपट स्पर्धेचे आयोजन; 45 हजार रुपयांची पारितोषिके

**छत्रपती संभाजीनगर, दि.२७ :** महात्मा गांधी मिशन आणि महात्मा गांधी स्मारक निधी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'अखिल भारतीय गांधी साहित्य संमेलन' निमित्त 'बापू थ्रू माय लेन्स' या राष्ट्रीय लघुपट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेच्या माध्यमातून गांधी विचार आणि मूल्यांचा समकालीन संदर्भ लघुपटाच्या माध्यमातून मांडण्यासाठी विद्यार्थी, नवोदित निर्माते, स्वतंत्र चित्रपट निर्माते, व्यावसायिक चित्रपट क्षेत्रातील व्यक्ती तसेच सिनेमा रसिकांना संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

सत्य, अहिंसा, स्वदेशी, स्वावलंबन, सर्वोदय, सामाजिक समानता, करुणा, शांतता, पर्यावरणीय जबाबदारी, महिला सक्षमीकरण, युवक नेतृत्व, सामाजिक समावेश, सांप्रदायिक सलोखा आणि शाश्वत विकास यांसह गांधी विचारांच्या समकालीन प्रासंगिकतेवर आधारित लघुपट या स्पर्धेसाठी सादर करता येणार आहेत. कथा, माहितीपट, ऐतिहासिक, समकालीन, प्रेरणादायी, उपहासात्मक, प्रायोगिक तसेच ॲनिमेशन स्वरूपातील लघुपटांनाही स्पर्धेत सहभागी होता येईल.

# विघ्नहर्ता गणेश मंदिरात समरसतेची महाआरती भक्तिभावात

## 'आपण सारे एक' या भावनेतून आयोजन; विविध समाजघटकांतील बांधवांचा सन्मान

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर, प्रतिनिधी :** सिडको एन-३ येथील विघ्नहर्ता गणपती मंदिराच्या वतीने आणि डॉ. सूर्यकांत शिरपेवार यांच्या पुढाकारातून 'आपण सारे एक' या समरसतेच्या भावनेतून महाआरतीचे आयोजन करण्यात आले. २४ सप्टेंबर रोजी रात्री ८ वाजता झालेल्या या महाआरतीत विविध समाजघटकांतील बांधव सहभागी झाले होते.



समाजातील उपेक्षित व वंचित बांधवांना सन्मानाची प्रतिष्ठा देत सामाजिक एकतेचा संदेश देण्यासाठी या महाआरतीचे आयोजन करण्यात आले होते. सुधीर कोर्टीकर, शंकर रोकडे, सौरव रोकडे, महावीर गायकवाड, सुखदेव खरात, राजेश तसेच अमोल पगारे यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. महाआरतीनंतर सहभागी मान्यवरांचा विघ्नहर्ता गणपती मंदिराच्या वतीने शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी सेवा भारती देवगिरी प्रांताचे अध्यक्ष डॉ. सूर्यकांत शिरपेवार म्हणाले, "आपल्या मनातील भेदाभेदाची भावना दूर झाली पाहिजे. देवाच्या दृष्टीने सर्व माणसे समान आहेत. त्यामुळे आपणही एकमेकांकडे सन्मानाने आणि आपुलकीने पाहिले पाहिजे. समाजातील सर्व स्तरांतील बांधवांना सन्मानाने सोबत घेऊन समरसतेचा संदेश देणारी ही महाआरती ठरावी. समाज खऱ्या अर्थाने मोठा होतो तो सामान्य माणसाला प्रतिष्ठा दिल्याने. आपण सारेजण एक आहोत, ही भावना निर्माण झाली तरच खरी सामाजिक समरसता निर्माण होईल."

कार्यक्रमास विघ्नहर्ता गणपती मंदिराचे अध्यक्ष अनिल भालेराव, उपाध्यक्ष शिवाजीराव शिंदे, कार्यकारिणी सदस्य गजानन देशमुख, विजय मठपती, विलासराव पवार, प्रदीप धारणकर यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच सूर्य-प्रभात शाखेचे मुख्य शिक्षक अरुण जोशी यांच्यासह अनेक स्वयंसेवक उपस्थित होते.

## 'माय सिटी' फिल्म कॅटेगरीचाही समावेश

**नवी दिल्ली :** स्मार्टफोन ब्रँड वीवोने नॅशनल जिओग्राफिक क्रिएटिववर्क्सच्या सहकार्याने वीवो इमेजिन स्मार्टफोन फोटोग्राफी अवॉर्ड्सच्या चौथ्या पर्वाची घोषणा केली आहे. 'आपली जिज्ञासा तुम्हाला कुठे घेऊन जाते?' या थीमअंतर्गत देशभरातील फोटोग्राफी आणि व्हिडिओग्राफीप्रेमींना स्मार्टफोनच्या माध्यमातून सर्जनशीलता आणि व्हिज्युअल स्टोरीटेलिंग सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. स्पर्धेसाठी प्रवेश 23 सप्टेंबरपासून सुरू असून 1 नोव्हेंबर 2026 पर्यंत खुले आहेत.

यंदाच्या पर्वात पोर्ट्रेट, नेचर अँड लँडस्केप, नाइट अँड लाइट, मोशन तसेच स्ट्रीट अँड कल्चर या पाच फोटोग्राफी कॅटेगरी आहेत. याशिवाय 'माय सिटी' या थीमसह फिल्म कॅटेगरीचा प्रथमच समावेश करण्यात आला आहे. या माध्यमातून शॉर्ट-फॉर्म व्हिडिओ आणि स्मार्टफोन स्टोरीटेलिंगला प्रोत्साहन दिले जाणार आहे.




स्कॅन करा

Flipkart amazon.in वरही उपलब्ध*

10 YEAR WARRANTY | BAJAJ SECURE • AMC • ROAD SIDE ASSISTANCE

72198 21111

*अटी व शर्ती लागू. नमूद केलेले ESRPs, हे 125 सिंगल सीट व्हेरिएंटसाठी आहेत. स्टंट्स हे तज्ज्ञांनी, व्यावसायिक देखरेखीखाली, नियंत्रित आणि बंदिस्त वातावरणात, सामान्य नागरिक किंवा सार्वजनिक रस्त्यांपासून दूर राहून केले आहेत. हे स्टंट्स करण्याचा प्रयत्न करू नका आणि नेहमी वाहतूक व सुरक्षा नियमांचे पालन करा. E-कॉम ऑफर्स संबंधित E-कॉम पार्टनरच्या नियम व अटींच्या अधीन आहेत. E-कॉम ऑफर्स वेगवेगळ्या पार्टनर्सनुसार बदलू शकतात. चित्रे केवळ प्रातिनिधिक स्वरूपासाठी आहेत. प्रत्यक्ष रंगांमध्ये फरक असू शकतो.

**Authorised Dealers For Bajaj Auto Ltd.: Aurangabad • Adalat Road** PAGARIYA BAJAJ 02406659937 • **AkashPusad** PAGARIYA BAJAJ 7709366111 • **Harsul Point** PAGARIYA BAJAJ 7709366111 • **Waluj** PAGARIYA BAJAJ 6616734 **Bhokardan Road Sillod** ASHOK BAJAJ 8380001965 • **Shendra** ASHOK BAJAJ 8380025694 • **Buldhana** ASHOK BAJAJ • **Jamkhed** Shivratna Bajaj 8975888188, 8929643158• **Jalna** AMBRISH BAJAJ 8605466906• **Ahmednagar Kinetic Chowk** Chhatrapati Bajaj 9175142881, • **Ahmednagar Savedi Naka** Chhatrapati Bajaj 8087203861 • **Kopargaon** Shirode Bajaj 9921009952, • **Rahuri** Shirode Bajaj 9921009953 • **Shrirampur** Shirode Bajaj 9270468998 • **Sangamner** MALPANI BAJAJ 9850112036, 02425-2225031.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## पर्यटन

# हिमालयातील उत्तरकाशी; नचिकेताच्या प्रदेशात !

**श्रीकांत पवनीकर**



"नेताला''..! वाहत्या गंगेच्या अरुंद किनाऱ्यावर असलेले व एकांतात वसलेले जणू काही गोष्टीतले टुमदार गावच! अत्यंत आकर्षक रंगीबेरंगी अशा तीनमजली गेस्ट हाऊससोबतच टेंटची व्यवस्था सुद्धा गंगेच्या किनारी... तिथला स्वप्नवत दोन रात्रीचा मुक्काम..! रात्री टॉर्च व टेंटच्या मंद प्रकाशात अगदी जवळून खळाळत वाहणारी व हटिलच्या प्रकाशाचा झोत अंगावर घेणारी गंगा कुणी क्वचितच "नेताला" या गावी बघितली असेल. गंगेच्या प्रवाहाचा धीर गंभीर ध्वनी रात्रीच्या अंधाराला चिरत जातो व अंगावर रोमांच उभे करतो. रात्रीच्या सुरम्य वातावरणात व गंगेच्या परिसरात रात्री खुर्च्या टाकून निवांतपणे बसण्याचे व काहीशा एकांत वातावरणात राहण्याचे भाग्य क्वचितच कुणाला लाभले असेल. हे आमचे सुदैव की या अनुभवाचे आम्ही साक्षीदार होतो. तसे बघितले तर नेताला हे गाव सुद्धा नाही.. हा आहे गंगोत्रीचा अतिशय विलोभनीय पण विरळ वस्ती असणारा "बेस कॅम्प". संपूर्ण हिमालयाच्या प्रवासामध्ये इतके सुंदर व अप्रतिम ठिकाण बघण्यात आलेले नाही..! गंगेचे कधी काळी दिसणारे रौद्र रूप किंवा विकट हास्य या ठिकाणी नाही... झुळझुळ वाहणाऱ्या प्रवाहाचा ध्वनी ऐकताच रोम रोम पुलकित होऊन जातो..! कुठूनही कुठल्याही बाजूने बघा हिमालयाचे सौंदर्य नेहमीच खुलत जाते. वनराजी व ओमकाराच्या ध्वनीने सतत वाहणारी गंगा दऱ्याखोऱ्यातून प्रवास करून उत्तरकाशीला मंदावते व आपण नचिकेताच्या प्रदेशात नतमस्तक होते...!

या नचिकेताच्या प्रदेशात यमुनोत्री ते गंगोत्रीच्या मार्गावर अनेक पर्वतांच्या रांगा पूर्वेला व दक्षिणेला दिसतात. यामध्ये सुसाट वेगाने भागीरथी (गंगा) वाहत असते. 'वरुणा' आणि 'असी' या दोन गंगेच्या उप नद्यांच्या मध्ये दहा मैल लांबीचा नितांत सुंदर पर्वतमय प्रदेश आहे. वरुणा आणि असी या दोन शब्दांवरूनच वाराणसी हा शब्द तयार झाला आहे. या प्रदेशातली रमणीय भूमी म्हणजेच पुराणात वर्णन केलेले सुप्रसिद्ध उत्तरकाशी..! वाराणावत पर्वताची पूर्वेकडील दरी व भागीरथीचा काठ या मध्ये लहानसे सपाट मैदान आहे. हा उत्तरकाशीचा मध्यभाग..! संपूर्ण परिसरच वाराणावत व बालखिल्य पर्वतांच्या पायथ्याशी आहे. उत्तरकाशी हे सर्वत्र पर्वतांनी वेढलेले असून आजूबाजूला सदाबहार देवदार वृक्षांची रम्य वनश्री सोबत!

कुणाची ही उत्तरकाशी? कोण हा बालक नचिकेता? पुराण काळातील परंपरेने चालत आलेले एक उत्तरकाशीतील अद्भुत पात्र. उत्तरकाशीचा स्वामी. नचिकेताचा मुक्काम याच पवित्र उत्तरकाशीत होता. रम्य वनश्री, पावित्र्य जपणारे पुरातन मंदिर, सुंदर सरोवर आणि सर्वत्र हिमालयाची सावली...! प्रत्यक्ष स्वर्ग असतो तो हाच का? येथेच राहायचे उद्दालक ऋषी आणि त्यांचा एकुलता एक पुत्र नचिकेता..! यमराजाला जिवंतपणी भेटण्याचे महतभाग्य केवळ दोनच व्यक्तींना लाभले. एक म्हणजे सावित्री व दुसरा नचिकेता. पतीच्या निधनानंतर सावित्रीला जिवंतपणी यमराजाला भेटून व मृत्यूच्या दाढेतून सत्यवानाला सोडवल्याची कथा प्रसिद्ध आहे. त्याचप्रमाणे यमपुरीच्या प्रवेशद्वारावर नचिकेताने सुद्धा तीन दिवस मुक्काम केला. कारण यमराज तीन दिवस आपल्या यमपुरीच्या महालात नव्हते. तीन दिवसाच्या प्रतीक्षेनंतर प्रत्यक्ष यमराजाला यमपुरीमध्ये जिवंतपणी भेटण्याचे भाग्य नचिकेता या बालकाला लाभले ते वडिलांच्या रागावर. "विश्वजित" यज्ञात उद्दालक ऋषी चांगल्या गाईऐवजी निरुपयोगी भाकड गायी दान करत असल्याचे बघून बालक नचिकेताला वाईट वाटले. वडील चांगल्या गाई दानात देत नव्हते याचे नचिकेताला वाईट वाटत होते..! वडिलांचा हा गाईचा मोह त्याला आवडला नाही. त्यामुळे रागात असलेल्या नचिकेताने, तुम्ही मला कुणाला दान करणार असा प्रश्न वडिलांना केला. या नेहमीच्या प्रश्नाने वैतागलेल्या उद्दालक ऋषींनी रागाने, "मी तुला यमपुरीतल्या यमराजाला दान करतो आणि जाऊन त्याला भेट" असे म्हटले. परंतु ही वडिलांची आज्ञा आहे असे मानून या बालकाने यमराजाचा शोध घेत यमपुरीचा सरळ रस्ता धरला तो याच उत्तरकाशीतून...! येथे नचिकेताच्या आश्रमाची जागा अजूनही आहे व भरपूर वेळ असल्यास बघता येते... येथे नचिकेताचे सरोवर सुद्धा आहे. हे सरोवर उद्दालक ऋषींनी निर्माण केले आहे. आज सुद्धा तेथे अज्ञात ऋषिमुनींचे अस्तित्व असते असे कळले. क्वचितच कुणी तेथे जातात. पॅकेज टूरमध्ये इतका वेळ नसतो. या अद्भुत निरागस बालकाला बघून यमराज प्रसन्न झालेत. मृत्यूच्या राज्यात राहून मृत्यूच्या देवतेकडूनच परम सत्याचे, आत्म्याचे व मृत्यूचे ज्ञान नचिकेताने यमराजकडून महत्प्रयासाने घेतले. यमराजाने प्रथम नकार दिला पण नचिकेताची जिद्द बघून यमराजाने शेवटी त्याला आत्म्याचे, मोक्षाचे आणि पुनर्जन्माचे ज्ञान दिले व आशीर्वाद दिलेत. त्यानंतर नचिकेता परत उत्तरकाशीच्या या आश्रमात परत आला. "मृत्यूनंतर पुढे काय"?, आत्म्याचे पुढे काय होते? याचे ज्ञान नचिकेताला झाले होते. तो परम संतुष्ट झाला. यात नचिकेताची अनासक्ती गौरवलेली आहे. या भूमीवर त्याच्या नामोच्चाराचा सतत ध्वनी ऐकणे हाच पवित्र अनुभव आहे. नचिकेताचे शारीरिक अस्तित्व या पवित्र भूमीवर प्रकट झाले व "आध्यात्मिक ज्ञानाची भूमी'' म्हणून हा उत्तरकाशीचा प्रदेश प्रसिद्ध झाला..! पण सावित्रीला व "वटपौर्णिमा" या पारंपरिक सणाला प्रचंड प्रसिद्धी मिळाली अन नचिकेता उपेक्षितच राहिला. या परिसरात असलेल्या वारणावत पर्वताच्या पायथ्याशी मुनीश्री नचिकेता थोडे विसावले आणि कायम इथलेच होऊन राहिले. पण नंतर हळूहळू ते सुवर्ण युग संपले.

**रविवार, २७ सप्टेंबर हा जागतिक पर्यटन दिवस आहे. त्यानिमित्त...**

वाराणसी म्हणजे आधुनिक बनारसला जसे विश्वनाथाचे मंदिर आहे त्याप्रमाणे येथे ही विश्वनाथासारखे देव मनकर्णिका हे पुरातन मंदिर आहे. पण आज आधुनिक बनारस एषोआराम व भौतिक सुखात दंग आहे. भौतिकवादाने पछाडलेले आहे. तसे इथे नाही... सत्तेचे व दिखाऊपणाचे अशांत जीवन इथले साधू जगत असतात. आजही उत्तर काशी हे साधे, जुन्या वळणाचे व भौतिकवादाने अकलंकित असे अतिपुरातन व अलौकिक धार्मिक खेडेच आहे. येथे सर्वच लोक प्रचंड धार्मिक वृत्तीचे साधे भोळे व सलोख्याने राहणारे दिसले. पहाडी लोकांची आपल्या ग्रामदेवतेवर प्रचंड श्रद्धा व भक्ती असते. दिखाऊपणाचा स्पर्श पण जाणवला नाही. इथले तपस्वी पर्वतांच्या गुहेत व आश्रमामध्ये समाधीसारख्या नीरव शांततेत कालक्रमण करीत असलेले दिसले. याच तपस्व्यांमध्ये परमगुरू स्वामी तपोवनजी महाराज हे सुद्धा होते. परमपूज्य स्वामी चिन्मयानंदांचे गुरू. दोघेही अध्यात्म्याच्या ज्ञानाचे धनी. यांना खरे ज्ञान हिमालयाच्या अनुभवातूनच मिळाले. रमणीय हिमालयाच्या प्रदेशातले हे एकांतमय शांत मैदान! अद्भुतच! अलौकिक दैवी सौंदर्य. हिलाच "सौम्य काशी" पण म्हणतात. उत्तरकाशीचा हा ईश्वर विश्वनाथाच्या रूपाने शाश्वत समाधीमध्ये एकांतात व नीरव शांततेत विश्रांती घेत आहे. येथील प्रमुख आकर्षण म्हणजे पुरातन विश्वनाथ मंदिर. प्राचीन महादेव मंदिर. अनेक आकर्षक स्थळे येथे आहेत. मंदिरात प्रवेश केल्याबरोबर एक विचित्र भारवलेपण शरीरात प्रवेश करते. मंद असा स्तोत्र ध्वनी वातावरणाचे गांभीर्य वाढवत होता. हे मंदिर भगवान परशुराम यांनी स्थापन केल्याची मान्यता आहे. महर्षी जमदग्नी हे पत्नी रेणुका मातेच्या समवेत या परिसरात राहत होते. सुदर्शन शहाची पत्नी महाराणी कांतीने या मंदिराचा जीर्णोद्धार १८५७ ला केल्याची माहिती दिसली. प्रत्यक्ष भागीरथाच्या तपस्येचे ठिकाण सुद्धा हेच आहे असेही येथे कळले. संख्याशास्त्राचे महान कर्ते कपिलमुनी यांचा आश्रम सुद्धा येथून एक दीड मैलावर होता असेही मंदिर व्यवस्थापनाकडून कळले. या भारावलेल्या मंदिरात जागृत शिवलिंगासमोर शिवमहिम्न स्तोत्र व इतर पाठ केलेत. पण या महादेव मंदिरातून पायच निघत नव्हता. आता स्तोत्रपठन थांबले होते. मंदिरातून निघताना घंटी वाजवली. एक पवित्र नाद निर्माण झाला. त्यातून ओमचे ध्वनी निघालेत. परत एकदा सर्वशक्तिमान व सार्वभौम अशा परमेश्वराचे दर्शन घेण्यासाठी अंतर्बाह्य पवित्र ओढ निर्माण झाली. एका अनामिक ओढीने कुणी तरी वारंवार शिवलिंगातून खुणावत आहे असा सतत भास होत होता. हीच आहे या भूमीची व पावित्र्याची अनामिक आसक्ती. समोरच असलेल्या शक्ती मंदिरात गेलो. येथे सहा फुटापेक्षा मोठा त्रिशूळ असून तो लाल वस्त्राने झालेला दिसला. याच त्रिशुळाने माता पार्वती देवीने महिषासुराचा वध केला म्हणून हे शक्तीचे व सुरक्षेचे प्रतीक मानण्यात येते. येथे एकादश मंदिर, परशुराम मंदिर, काली मंदिर अशी अनेक मंदिरे असून संक्रांतीला येथे फार मोठा मेळा भरतो. हा साराच परिसर जंगलयुक्त व पर्वतराजींनी व्यापलेला असून नचिकेता सरोवराकडे टॅक्सीने जाता येते. तेथे कुठलेही हॉटेल नाही. या परिसराच्या भोवती रम्य वनश्री असून अतिपुरातन मंदिरे असल्याची माहिती मिळाली. वृक्ष व वनस्पती यांचे अनोखे मिलन येथे बघायला मिळते. जणू काही परमेश्वराचे निर्गुण निराकार रूपच...! याच परिसरात भरदार दाढी व पांढऱ्या स्वच्छ कपड्यातले भारदस्त व्यक्तिमत्त्व असलेल्या "गुलाबचंद नेगी" या हिमालयतील एका अवलियासोबत भेट झाली. त्यांनी हिमालयातील आश्चर्यकारक घटना सांगितल्या. हा संपूर्ण भाग म्हणजे भूकंपप्रवण क्षेत्र आहे. एखादेच दुमजली घर येथे असेल. दुमजली घर बांधण्याची परवानगी येथे नाही. २००७ मध्ये आलेल्या भूकंपाने या मंदिरासमोर असलेला प्रचंड पर्वत शिखरापासून पायथ्यापर्यंत दोन भागात विलग झाला व पायथ्याशी असलेली सात आठ दुकाने जमिनीमध्ये लुप्त झालीत व क्षणात हा पर्वत जसाच्या तसा आश्चर्यकारकपणे जोडला गेला. आता सुद्धा आपण बघितले तर दोन पर्वतांमधली ती विलग झालेली रेषा शिखरापासून पायथ्यापर्यंत स्पष्टपणे दिसून येते. गुलाबचंद नेगी या अवलियाचे संपूर्ण आयुष्य हिमालय भटकण्यात व हिमालयाची छायाचित्रे काढण्यातच गेली. अक्षरशः हिमालयाच्या विविध छटा असलेली शेकडो छायाचित्रे त्यांच्या लहानशा प्रदर्शनात येथे बघायला मिळालीत व आश्चर्यचकित झालो. मात्र वेळेअभावी त्यांचा 'स्लाईड शो' बघता आला नाही याचे वाईल वाटले.

हिमालयांच्या शिखरांमधले असलेले विश्वनाथांचे हे पुरातन मंदिर. शीतल छाया, बालखिल्य व वारणावत पर्वतांचे सान्निध्य... सोबतीला गंगेचा काठ... काहीशा दूरवर असलेल्या नचिकेताच्या स्थानावरच्या मंगल स्मृती... उद्दालक ऋषींनी निर्माण केलेले नचिकेताचे सरोवर व प्राचीन महान ऋषींचे व त्यांच्या स्मृतींचे सान्निध्य असलेली भूमी म्हणजेच नचिकेताची उत्तरकाशी! स्वर्गीय व अलौकिक सौंदर्य लाभलेली रमणीय निर्जन वनश्री बघून डोळे दिपून गेलेत! परमेश्वर प्राप्तीकरिता यापेक्षा योग्य व स्वर्गीय जागा कुठे असेल? ■

९४२२०८४१४५

## रविवारची पत्रे

### महाराष्ट्र पक्षिमित्र पुरस्कार २०२६ साठी प्रस्ताव आमंत्रित

पक्षी संवर्धन, अधिवास संवर्धन आणि पक्षिविषयक जनजागृतीच्या क्षेत्रात सातत्याने कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांचा गौरव करून त्यांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र पक्षिमित्र संस्थेतर्फे २०१९ पासून विविध पुरस्कार प्रदान करण्यात येत आहेत. यंदाच्या महाराष्ट्र पक्षिमित्र पुरस्कार २०२६ साठी प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. यामध्ये पुढील पुरस्कारांचा समावेश आहे :

**१. स्व. रमेश लाडखेडकर स्मृती "महाराष्ट्र पक्षिमित्र जीवन गौरव पुरस्कार-२०२६"** : दीर्घकाळ पक्षिमित्र चळवळीत राहून पक्षी संवर्धन, अधिवास संवर्धन आणि पक्षिविषयक जनजागृतीसाठी उल्लेखनीय कार्य केलेल्या आणि वयाची ६० वर्षे पूर्ण केलेल्या ज्येष्ठ व्यक्तीच्या कार्याचा गौरव करण्यासाठी हा पुरस्कार देण्यात येईल.

**२. स्व. डॉ. जी. एन. वानखेडे स्मृती "महाराष्ट्र पक्षी संशोधन पुरस्कार-२०२६"** : पक्षिमित्र चळवळीशी संबंधित राहून पक्षी अभ्यास, संशोधन आणि त्यातून पक्षी संवर्धनासाठी कार्य करणाऱ्या व्यक्ती किंवा संस्थेला हा पुरस्कार देण्यात येईल. पीएच. डी. संशोधन, विविध प्रकल्पांतील कार्य, संशोधन निबंध, प्रकाशित साहित्य, शोधनिबंध, अहवाल, पक्षी नोंदणी अहवाल आदींचा पुरस्कारासाठी विचार करण्यात येईल.



**३. श्री. अनिल बहादुरे, नागपूर यांच्यातर्फे प्रायोजित "नामदेवराव बहादुरे पक्षी संवर्धन व शुश्रूषा पुरस्कार-२०२६"** : पक्षिमित्र चळवळीत राहून पक्षी संवर्धन, अधिवास संवर्धन तसेच जखमी पक्ष्यांचे उपचार, शुश्रूषा आणि पुनर्वसन या क्षेत्रांत कार्य करणाऱ्या व्यक्ती किंवा संस्थेला हा पुरस्कार देण्यात येईल.

**४. रामभाऊ शिरोडे (वाणी) स्मृती "महाराष्ट्र पक्षिमित्र जनजागृती पुरस्कार-२०२६"** : पक्षिमित्र चळवळीशी संबंधित राहून पक्षी अभ्यासाच्या माध्यमातून पक्षिविषयक जनजागृती आणि संवर्धनासाठी कार्य करणाऱ्या व्यक्ती किंवा संस्थेला हा पुरस्कार देण्यात येईल.

**५. स्व. प्रकाशसिंह नारायणसिंह मोरे स्मृती "पक्षिमित्र पत्रकारिता पुरस्कार-२०२६"** : पक्षिविषयक जनजागृती, संवर्धन आणि संशोधनाला चालना देणारी सकारात्मक पत्रकारिता करणाऱ्या नियमित पत्रकार किंवा पत्रकार पक्षिमित्रास हा पुरस्कार देण्यात येईल. हा पुरस्कार दर दोन वर्षांनी प्रदान करण्यात येतो.

**६. श्रीमती सुशीला पाटकर स्मृती "महाराष्ट्र पक्षिमित्र पक्षी साहित्य पुरस्कार-२०२६"** : पक्षिविषयक साहित्य क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानासाठी हा पुरस्कार देण्यात येईल. प्रकाशित साहित्याच्या माध्यमातून पक्षिविषयक ज्ञानाचा प्रसार व प्रचार होण्यासाठी झालेले योगदान तसेच पक्षिविषयक जनजागृतीमध्ये साहित्याची भूमिका यांचा प्रामुख्याने विचार करण्यात येईल.

पुरस्कारासाठी निवड करताना संस्थांच्या बाबतीत महाराष्ट्र पक्षिमित्रशी संलग्नता, तर व्यक्तींच्या बाबतीत महाराष्ट्र पक्षिमित्रचे सभासदत्व, पक्षिमित्र संमेलनातील सहभाग आणि पक्षिमित्र चळवळीतील योगदान यांचा प्राधान्याने विचार करण्यात येईल. या पुरस्कारांसाठी स्वतःहून किंवा इतर व्यक्ती/संस्थेमार्फत प्रस्ताव सादर करता येतील. महाराष्ट्र पक्षिमित्र कार्यकारिणीतील सदस्य किंवा त्यांचे कुटुंबीय या पुरस्कारांसाठी प्रस्ताव सादर करू शकणार नाहीत तसेच त्यांना पुरस्कार देण्यात येणार नाही. पुरस्कारासाठी प्रस्ताव १५ ऑक्टोबर २०२६ पर्यंत, 'कार्यवाह, महाराष्ट्र पक्षिमित्र, द्वारा प्रा. डॉ. गजानन वाघ, ६३, अरण्यार्पण, समता कॉलनी, कठोरा रोड, व्हीएमव्ही पोस्ट, अमरावती-४४४६०४ या पत्त्यावर पाठवावेत.

तसेच संपूर्ण प्रस्ताव स्कॅन करून पीडीएफ स्वरूपात कागदरहित पद्धतीने संस्थेच्या pakshimitra@gmail.com या ई-मेलवर पाठविता येईल. अर्जाचा नमुना आणि पुरस्कारांची सविस्तर माहिती www.pakshimitra.org या संस्थेच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. यंदाचे पक्षिमित्र संमेलन २६ व २७ डिसेंबर २०२६ रोजी नाशिक येथे होणार असून, याच संमेलनात महाराष्ट्र पक्षिमित्र पुरस्कारांचे वितरण करण्यात येणार आहे.

**नितीन अरुण मराठे**/९४२११८९३३३
(कार्यकारिणी सदस्य, महाराष्ट्र पक्षिमित्र)

■■■

### अन्त्यसंस्कार : एक दाहक सत्य

एकदा नामदेवाच्या दुकानातून दिवसभर कापडाची विक्री झाली नाही. नामदेवाला रात्रीच्या जेवणाची भ्रांत पडली. आपल्या लाडक्या भक्तासाठी विठ्ठलाने वेषांतर केले आणि संपूर्ण कापड खरेदी केले. आपल्या शरीराची शेवटच्या क्षणी गरज असते ती फक्त साडेतीन हात कापडाची. ग्रामीण भागात म्हण आहे, कोणाच्या घरी तोरणाला नाही जाता आले तरी चालेल पण मरणाला जावे. हिंदू संस्कृतीचे जतन करणारे आपण सुज्ञ.

जन्मापासून ते मृत्यूपर्यंत या देहाला १६ संस्कारातून परिपूर्णता येते. सामाजिक रूढी परंपरेची शृंखला हिंदू धर्मातला प्रत्येक जण अभिमानाने पार पाडतो. सध्याच्या परिस्थितीत कुटुंबाची मर्यादित संख्या आणि आधुनिक जीवनशैलीने समाज एका वेगळ्या वळणावर आहे. वृद्धत्व, अपंगत्व यातून मार्ग काढीत पाळणाघरापासून ते वृद्धाश्रमापर्यंत सेवा देणाऱ्या संस्था अपरिहार्यपणे उभ्या आहेत. उत्तम सुविधांनी युक्त अशी काळजीवाहक केंद्रे मोठ्या शहरांची गरज झालेली आहे. मुलं परदेशात असतात, अशावेळी या संस्था अनेकांना रोजगार मिळवून देतात हे खरे आहे, पण या लेखनप्रपंचागा विषय वेगळा आहे.

गत दोन महिन्यांपूर्वीच घटना. एक अर्ध्या संसारातून दुर्धर आजाराने सोडून गेलेली एक स्त्री आणि जगून झालं पण भगवंताचे भोग म्हणून अवघ्या एक महिन्यानंतर स्वर्गवास होणारी एक आई. प्रसंग हृदयद्रावकच. दोन्ही मोठ्या शहरातील घटना. केअर सेंटरमधून मृत व्यक्तीचे शरीर दोन तीन तासांकरिता घरी आणले. अर्थात शववाहिका दारातच उभी होती. हळूहळू गर्दी जमू लागली. न्यायची वेळ आली. शीतपेटीतून देह बाहेर काढून त्यावर घरी विधिवत संस्कार केले आणि अन्त्यविधीसाठी हा देह ज्या पंचमहाभूतांचा बनलेला आहे, ते शेवटचे मंत्रोच्चार घाटावर पार पडले. मुलांनी संस्कार पूर्ण केले. आणि रात्री चर्चा झाली कोण होती ती संस्था? कोण पुरोहित होते? आणि आश्चर्य आपण ज्याला घाटावरचे क्रियाकर्म म्हणतो ते ब्राह्मण वेगळे असतात, आपल्याला कल्पना आहे. परंतु मी जो अनुभव घेतला तो सुन्न करणारा होता. महानगरात संस्कार ज्यांनी केले, ज्या संस्थेला म्हणून सांगितले होते ते अन्य धर्मीय होते. त्यांना विचारले असता ते म्हणाले, आम्ही हे सगळं शिकून घेतलं. बरेच दिवसापासून आम्ही हा व्यवसाय करतो आहे.

या घटनेने मी अस्वस्थ झाले. मला राहावले नाही. मी त्या कंपनीची माहिती काढली. त्यावेळी त्यांनी सहजपणे सांगितले, आम्ही मराठी आणि उत्तर भारतीयांना त्यांचे गुरुजी उपलब्ध करून देतो. त्यांच्या माहिती पत्रकानुसार हिंदू आणि कॅथॉलिक संस्कारासाठी संपर्क असे मी वाचले. या गोष्टीची पुष्टी आणखीन एका मराठी कुटुंबाने मला दिली.

वाचक हो, आपण आपल्या संस्कृतीनुसार शेवटचा संस्कार इतर धर्मीयांच्या हातून करणार का? बदलत्या बंद घरांच्या शैलीतून आपला शेजारी संपर्क नसतो, नातेवाईक नसतात म्हणून या सगळ्या सेवा पुरवणारे यांची गरज आहे पण यातही आपल्या धर्मावर अतिक्रमण नाही का? मोठ्या शहरांमध्ये अशा इतर धर्मीयांनी सेवा पुरवणे हे सहज शक्य होत आहे. तंत्रज्ञानाच्या युगात एका क्लिकवर अशा सेवा संस्था उपलब्ध आहेत आणि या अग्निसंस्कार करण्यासाठी सरसावल्या आहेत.

मी अनुभवलेलं एक सत्य आहे. त्याची दाहकता नक्कीच आहे. लव्ह जिहाद, लॅण्ड जिहाद ही नित्याची बाब. वाराणसीतही एका भाविकाने अनुभव घेतला. पूजेसाठी कोणी यादव नाव सांगितले आणि वेळेत न आल्याने विचारणा केली असता सहज उत्तर मिळाले, तो नमाज पढायला गेला आहे. या दोन्ही घटना सत्य घटना आहेत. आपल्यासाठी संस्कार महत्त्वाचे असतात. त्याकरिता संस्कारात काम करणाऱ्या व्यक्तींना ओळखपत्र देऊन या प्रकारचे पौरोहित्य करणारी मंडळी पुढे यावीत आणि आपल्या धर्मावर होत असलेले अतिक्रमण थांबावावे.

**ॲड. वंदना नवघरे**/पुणे. ९९२३५०४६१६

■■■

### इंडिया आघाडीची पोटदुखी आणि एसआयआरचा खुळखुळा

एका वृत्तपत्रात निवडणूक आयोगातल्या मतभेदावर लेख छापून आला आणि व्होटचोरीचे खुळखुळे वाजणे सुरू झाले. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार व्होटचोर आहेत, भाजपाचे एजंट आहेत वगैरे वगैरे . राहुल गांधींनी पत्रकार परिषद घेऊन मोठ्ठा खुळखुळा वाजवत थेट मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांना माफीचा साक्षीदार होऊन व्होटचोरी प्रकारणातून पापमुक्त होण्याचा सल्ला दिला. धन्य आहे हे सगळे नेते आणि त्यांचे समर्थक. कोणताही मुद्दा समजून न घेता नुसताच तोंडाचा खुळखुळा वाजवणे सुरू आहे. आता त्या लेखाच्या निमित्ताने घेतलेले आक्षेप आणि सत्यता समजून घेऊ.

**१) आक्षेप** - इतर दोन निवडणूक आयुक्तांनी (संधू आणि जोशी) गेल्या १० महिन्यांत १४ वेळा विरोधी मत प्रदर्शन केले.

**सत्य** - याचा अर्थ निवडणूक आयोग स्वतंत्र संस्था असून तिथे निवडणुकी संदर्भात चर्चा होतात आणि चर्चे दरम्यान सदस्यांना विरोध करण्याचे मत स्वातंत्र्य आहे हे सिद्ध होते. तसेच चर्चेत मतभिनन्ता असणे हे लोकशाहीचे लक्षण आहे. विषयवार चर्चेत मतभिन्नता असताना निवडणूक आयोगात निर्णय मात्र एकमताने किंवा बहुमताने (तीनपैकी दोन मताने) घेतले जातात. ही अत्यंत सर्वमान्य कायदेशीर बाब आहे. सुप्रीम कोर्टात सुद्धा निकाल एकमताने किंवा बहुमताने दिले जातात. काही न्यायमूर्ती निकालाच्या विरोधी मत देतात. देशात सर्वात जास्त गाजलेल्या केशवानंद खटल्यात सुप्रीम कोर्टाचा निकाल ७ न्यायमूर्ती विरुद्ध ६ न्यायमूर्ती असा होता. ईडब्ल्यूएस लागू करण्याचा निर्णय सुप्रीम कोर्टात ३ विरुद्ध २ मताने मंजूर झाला होता. या खटल्यात ज्या न्यायमूर्तींनी निकालाविरुद्ध मत दिले त्यांच्यावर अन्याय झाला किंवा सुप्रीम कोर्ट पक्षपाती आहे असे म्हटले जात नाही.

दुसरे म्हणजे इतर दोन निवडणूक आयुक्तांना त्यांच्यावर अन्याय होत असेल तर मा. राष्ट्रपतींकडे तक्रार करून न्याय मागता येतो. आतापर्यंत तरी इतर दोन निवडणूक आयुक्तांनी अशी मा. राष्ट्रपतींकडे दाद मागितल्याची बातमी नाही. म्हणजेच निवडणूक आयोगाचे कार्य योग्य पद्धतीने सुरू आहे.

**२) आक्षेप** - एसआयआर फॉर्म नंबर ६ अवैध आहे.

**सत्य** - बिहार आणि बंगालच्या निवडणुकीपूर्वी एसआयआर, फॉर्म नंबर ६ सहित अनेक मुद्यांवर गदारोळ झाला होता. तो विषय सुप्रीम कोर्टात पोहोचला. सुप्रीम कोर्टाने २७ मे २०२६ ला निर्णय दिला की मतदारयादी दुरुस्त करण्यासंबंधी कार्यवाही करण्याचे संपूर्ण अधिकार निवडणूक आयोगाला आहेत. तसेच संविधान आर्टिकल ३२४ आणि लोक प्रतिनिधित्व अधिनियम १९५० नुसार एसआयआरअंतर्गत फॉर्म नंबर ६ घेण्याचा वैध अधिकार निवडणूक आयोगाला आहे.

एवढा स्पष्ट निर्णय सुप्रीम कोर्टाने दिल्यावर पुन्हा त्यावर खकाना करत निवडणूक आयोगावर टीका करणे हे दुसरे तिसरे काही नसून सत्ता मिळाली नाही याची पोटदुखी आहे. आपल्याला मतदारांनी झिडकारले हे सत्य स्वीकारण्याऐवजी त्याचे खापर निवडणूक आयोगावर फोडून सर्वसामान्य मतदारांच्या मनात संभ्रम उत्पन्न करण्याचा प्रयत्न सुरू आहे.

**राजेश गढीकर**/९४२२८६८३३३

■■■

### आग रामेश्वरी, बंब सोमेश्वरी

'स्वायत्ततेची परीक्षा', हा अग्रलेख वाचला. या लेखातील बरेच मुद्दे पटले. निवडणूक आयोगाने केलेल्या कार्यपद्धतीवर आक्षेप असतील तर राजकीय पक्षांनी न्यायालयाचा दरवाजा ठोठावला पाहिजे. तसे न करता केवळ बिनबुडाच्या आरोपांची राळ उडवण्यात विरोधी पक्षनेते व्यस्त आहेत. विरोधी पक्षनेते निवडणूक आयोगाच्या नावाने शिमगा करत आहेत, त्याचे सगळ्यात मोठे कारण आहे ते देशभरातील जनतेने पंतप्रधान नरेंद्र मोदींना दिलेले गगनभेदी यश आणि विरोधकांचा सातत्याने होणारा पराभव! त्याशिवाय देशाचे नागरिकत्व घेण्याआधीच सोनिया गांधींची मतदारयादीतील मतदार म्हणून झालेली नोंद! मोदींना मिळत असलेल्या यशाचे सर्वांत मोठे खापर विरोधी पक्षनेते निवडणूक आयोगावर फोडत आहेत. ईव्हीएम, एसआयआर, व्होटचोरी हे त्यातील मुख्य आक्षेप. व्होटचोरी झाली हे विरोधकांचे म्हणणे घटकाभर खरेही मानले तरी लोकसभा निवडणुकांमध्ये रालोआला चारशे पार नेण्यात भाजपला अपयश का आले? कर्नाटक, पंजाब, हिमाचल प्रदेश, तामिळनाडू, केरळ, तेलंगणासारख्या राज्यात रालोआ सरकार का स्थापन झाले नाही, या साध्या गोष्टींचा विचार करण्याची तसदी विरोधक घेत नाहीत.

जेथे विरोधी पक्ष जिंकतात तेथे सगळे काही आलबेल असते आणि जेथे भाजप रालोआ जिंकते तेथे सर्व गैरप्रकार होतात, हे मानणे शुद्ध दिशाभूल करण्यासारखे आहे. निवडणूक आयोगाने काम कसे करावे हे सांगण्याचा अधिकार असला तरीही ते सरसकट असंवैधानिक कामे करतात असेही म्हणणे अयोग्य आहे. एकशे चाळीस कोटी लोकसंख्या असलेल्या देशात मतदारयादी बनवणे हे कठीण काम आहे. तरीही झालेल्या चुका दुरुस्त करण्याची तयारी निवडणूक आयोगाने सतत दाखवली आहे आणि ही प्रक्रिया सातत्याने सुरू असते हेही लक्षात घेतले पाहिजे. सध्या तर विरोधी पक्षांचा एकाही संवैधानिक संस्थेवर विश्वास नाही. याचा अर्थ काही प्रसारमाध्यमे (तरुण भारत नव्हे), तारतम्य न बाळगता, त्यांचीच री ओढत आहेत.

काँग्रेस काळात तत्कालीन सरकारांनी वर्षानुवर्षे निवडणूक आयोगाला हाताशी धरून केलेल्या 'पराक्रमां'वर, हाताची घडी घालून तोंडावर बोटे ठेवलेली आणि बापूंच्या तीन माकडांच्या भूमिकेत गेलेली काही प्रसारमाध्यमे सध्या बृहस्पतीच्या बुद्धीने आणि वाचस्पतीच्या वाणीने संवैधानिक संस्थांवर टीका करू लागली आहेत. संवैधानिक संस्थांविरोधात न्यायालयाचा दरवाजा ठोठावण्याऐवजी रस्त्यावर उतरून हिंसेच्या मार्गाने, देशात अराजकता पसरवून 'न्याय' मिळविण्याच्या वल्गना करणाऱ्यांचे समर्थन करू लागली आहेत. अशा प्रसारमाध्यमांच्या अपप्रचाराला जनता गेल्या बारा वर्षांत बळी पडलेली नाही आणि इथून पुढेही बळी पडणार नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या पाठीशी देशातील जनता खंबीरपणे उभी आहे आणि भविष्यात राहीलही.

**शिवराम वैद्य**/पुणे. ९८५०५१८०१८

■■■

### कायमस्वरूपी समस्या रस्ते

आपल्या सर्वांच्या जीवनाशी रस्ते किती जिव्हाळ्याने चिकटलेले आहेत, हे आपल्याला वेगळे सांगायला नको. रस्त्यावर जाताना खाचखळगे, खड्डे येणारच. परंतु निरंतर सेवा देणारे हे रस्ते बऱ्याचवेळा का असे त्रासदायक असतात असा प्रश्न येतो आणि मग सुरू होते प्रश्नांची मालिका... सामान्य जनता म्हणून आपण विचार करतो, अरे आपण रोड टॅक्स भरतो, टोल टॅक्स भरतो याचे हेच का फलित? काही रस्ते तर अपघातासाठी प्रसिद्धच आहेत. अपघात सोडा पण मानवाने मानवाची केलेली थट्टा असे काहीसे रस्त्यांसाठी म्हणावेसे वाटते. रस्त्यांचा काही जास्त संबंध आला नसताना देखील प्रत्येक जण रस्त्यावरून जाताना खड्डारूपी तीर्थात स्नान करतो. पावसाळ्यात वारंवार असा अनुभव येतो. नाहीतर आचकेउचके लागून शरीर खिळखिळे होते. त्यातूनच हाडांचे विकार आणि गुडघेदुखी लहान वयातच आपल्या मागे लागू शकते. खूप लोक म्हणतील पूर्वी होते का रस्ते? एवढी सुविधा होती का? पण आता तर किती सोयी झाल्या, चकाचक आणि गावागावात देखील सिमेंटचे रस्ते झाले आहेत. सिमेंटची जंगले उभी झाली आहेत. पण या रस्त्याचा आनंद हा रस्ता काही मिळू देत नाही. कारण थोडं अंतर गेलं की एकतर खड्डे नाही तर खोदून ठेवलेले रस्ते हमखास समोर येतात आणि त्यांच्यातून वाट काढत काढत आपली वाट लागते की काय याची भीती मात्र प्रत्येकाच्या मनात असते. गाडी स्लिप झाली की डिस्क स्लिप झाली म्हणून समजा. टू व्हीलर किंवा फोर व्हीलर यामध्ये फरक असला तरी फोर व्हीलरचे गचके त्यांनाच माहिती आणि टू व्हीलरचे रामायण तर काही वेगळेच आहे. येथे तर अख्ख्या शरीराचीच वाट लागते.

सुजाण नागरिक म्हणून विचार केला तर असे होण्याचे कारण काय? नवीन रस्ते तयार झाले की दुसऱ्या विभागाचे लोक तो रस्ता अक्षरशः खोदून खोदून मोकळे होतात आणि खूप दिवस पर्यंत काम रेंगाळत ठेवतात. केबल, नळांचे कनेक्शन घेण्यासाठी प्रत्येक घरासमोर गल्ली-बोळातून खोदून ठेवले असते. पाईप टाकल्यानंतर तेथे काही भरण न टाकता तसेच मोकळे सोडून देतात म्हणजे ते पाईप फुटायला मोकळे. इतर देशांची तुलना केल्यास या सर्वच गोष्टी अतिशय ओंगळवाण्या आहेत. केवळ भ्रष्टाचाराची कीड हेच मुख्य कारण आहे. आपापल्या गावातले रस्ते चांगले राहावे आणि व्हावे यासाठी नागरिकांनी समोर येऊन आंदोलन करावे, चळवळ उभारावी त्यामुळे सर्वांचे स्वास्थ्य चांगले राहण्यास मदत होणार आहे. चांगला हेतू असला तर देशसेवा कोणत्याही माध्यमातून नागरिक करू शकतात.

**डॉ. अचला तांबोळी**/९८९०६१७५३९

■■■

### प्रत्येक कर्णबधिर मूल बोलेल

जन्मजात कर्णबधिर बालकांचे वाचाभाषा प्रशिक्षण, त्याद्वारे त्यांचे पुनर्वसन ही एक गहन समस्या आहे. २०११ सालच्या जनगणनेनुसार आपल्या देशात त्यावर्षी सुमारे ६५००० बालके जन्मजात कर्णबधिर जन्माला आली असावीत. महाराष्ट्रात यातील ६००० बालके जन्माला आली, असू शकतात. म्हणजेच दर वर्षी एवढ्या मोठ्या संख्येमध्ये अशी मुले जन्माला येत आहेत. ही मुले बहुतांशी, एक ऐकणे (आणि त्यामुळे बोलणे) सोडले तर शारीरिक व मानसिक दृष्ट्या सर्वसाधारण असतात. ऐकू न आल्यामुळे त्यांना बोलता येत नाही, त्यामुळे अर्थातच शिक्षणावर मर्यादा येतात. समाजात मिसळता न आल्यामुळे व्यक्तिमत्त्वाच्या विकासावरही गंभीर परिणाम होतो.

काही वर्षांपूर्वी अशी मुले खूप उशिरा म्हणजे ७-८ वर्ष वयानंतर, वैद्यकीय सेवेसाठी किंवा शिक्षणासाठी समोर येत असत. पण वाचाभाषा प्राप्तीचे वय निघून गेले असल्यामुळे, त्यांच्यासाठी फार काही करता येत नसे. पण बदलत्या काळात, माहितीच्या या युगामध्ये, सध्या अशी मुले अगदी लवकर म्हणजे चार महिने, सहा महिने, एक ते दोन वर्षे या वयात डॉक्टरांच्या दवाखान्यात, ऑडिओलॉजिस्टच्या क्लिनिकमध्ये डोकावताना दिसत आहेत. एवढेच नाही तर सरकारी योजना, सीएसआरच्या माध्यमातून मिळणारी मदत किंवा दुर्मिळपणे वैयक्तिकरीत्या पैसे उभे करून यातील बहुतांशी मुले कॉक्लिअर इम्प्लांटची अति खर्चीक शस्त्रक्रिया करून घेण्यात यशस्वी ठरत आहेत. पण खरा प्रश्न त्यानंतरचा आहे. या शस्त्रक्रियेनंतर अशा मुलांना वयाच्या ६ वर्ष वयापर्यंत नियमित वाचाभाषा प्रशिक्षण मिळणे अत्यंत जरुरीचे आहे. नाहीतर एवढ्या खर्चीक शस्त्रक्रियेचा काहीही फायदा होणार नाही. आज मितीस यात येणाऱ्या अडचणी खूप आहेत. एक तर वाचाभाषा प्रशिक्षण देणाऱ्या अशा विशेष प्रशिक्षकांची वानवा आहे. इतर सर्वसाधारण शिक्षणामध्ये म्हणजे पूर्वप्राथमिक शिक्षण किंवा प्राथमिक शिक्षण यामध्ये जसे पूर्वापार चालत आलेले, ठरलेले मापदंड अभ्यासक्रम असतात. तसे येथे दिसत नाही. त्यामुळे या सर्व विषयात संदिग्धतेचे प्रमाण बरेच आढळून येते. या सर्व कारणांनी प्रशिक्षणानंतर अशा मुलांच्यामध्ये ऐकून बोलणे याबाबतचे यश संमिश्र असते.

आजच्या माहितीच्या युगामध्ये जेव्हा कॉक्लिअर इम्प्लांट शस्त्रक्रिया बहुतांशी कर्णबधिर मुलांची होते आहे तेव्हा ऐकून व्यवस्थित बोलणारी मुले तयार व्हायची असतील तर गांभीर्याने काही गोष्टी कराव्या लागतील. शासनाच्या पुढाकाराने या विषयाच्या संदर्भातील तज्ज्ञ मंडळी म्हणजे कान-नाक-घसा तज्ज्ञ, बालरोग तज्ज्ञ, ऑडिओलॉजिस्ट, स्पीच थेरपिस्ट आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे कर्णबधिर बालकांसाठीचे विशेष प्रशिक्षक यांची एक समिती झाली पाहिजे. त्यांनी एकत्रित येऊन ० ते ६ वर्षे कर्णबधिर बालकांसाठीचा विशेष अभ्यासक्रम तयार केला पाहिजे आणि असा अभ्यासक्रम राबवणाऱ्या पूर्व प्राथमिक शाळा किमान तालुका पातळीपर्यन्त तयार झाल्या पाहिजेत. यामुळे ही सर्व मुले पहिलीमध्ये सर्वसाधारण म्हणजे ऐकणाऱ्या व बोलणाऱ्या मुलांच्या शाळेत प्रवेश घेतील आणि सर्वसाधारण समाजात मुख्य प्रवाहात सामील होतील. ■

**डॉ. अविनाश वाचासुंदर**/९८२२०४६०७२

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## डोंगरगाव बोरी येथे कोरड्या दुष्काळाचा बळी



तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ दि. २७ सप्टेंबर : पावसाअभावी उभे पीक करपल्याने आणि कर्जाचा वाढता भार असह्य झाल्याने डोंगरगाव बोरी येथील ३३ वर्षीय अल्पभूधारक शेतकरी अंकुश रमेश काळे यांनी स्वतःच्या शेतात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना घडली. काळे यांच्या नावावर दोन एकर शेती असून, शेतीच्या उत्पन्नातून कुटुंबाचा उदरनिर्वाह होत नसल्याने ते सालगडी म्हणूनही काम करत होते. त्यांच्यावर जिल्हा मध्यवर्ती बँकेचे ४० हजार व स्टेट बँकेचे एक लाख, असे सुमारे १ लाख ४० हजार रुपयांचे कर्ज असल्याचे सांगण्यात येते. यंदा पावसाअभावी नापिकी झाल्याने आर्थिक संकट अधिकच गंभीर झाले होते. या घटनेने तालुक्यात हळहळ व्यक्त होत असून, प्रशासनाने मृत शेतकऱ्याच्या कुटुंबाला तातडीने आर्थिक मदत व शासनाच्या उपलब्ध योजनांचा लाभ मिळवून द्यावा, अशी मागणी होत आहे.



## विविध वृत्त.....

## संत मारुती महाराज कारखान्याचे बॉयलर अग्निप्रदीपन



तभा वृत्तसेवा

औसा दि. २७ सप्टेंबर : बेलकुंड येथील श्रीसंत शिरोमणी मारूती महाराज सहकारी साखर कारखान्याच्या यावर्षीच्या गळीत हंगामाचा बॉयलर अग्निप्रदीपन ह.भ.प. महेश महाराज माकणीकर यांच्या हस्ते उत्साहात पार पडला आहे.

देवताळा संस्थानचे महंत राजेंद्र गिरी महाराज यांची प्रमुख उपस्थिती होती. तर कारखान्याचे चेअरमन शाम रविंद्र भोसले, व्हा. चेअरमन सचिन पाटील यांच्यासह संचालक मंडळ उपस्थित होते. त्यापूर्वी कारखान्याचे संचालक शामराव निवृत्ती साळुंके व त्यांच्या पत्नी यांच्या हस्ते बॉयलर होमहवन व पूजाविधी पार पडला.यावेळी कारखान्याचे माजी व्हा. चेअरमन उदयसिंह देशमुख, संचालक गणपती बाजुळगे, शामराव साळुंके, सुभाष जाधव, अँड. बाबासाहेब गायकवाड, भरत माळी-फुलसुंदर, संतोष भोसले, अमित माने, रमेश वळके, अनिल पाटील, विलास काळे, गोविंद सोनटक्के, चंद्रसेन पाटील, शिवाजी बिराजदार, कार्यकारी संचालक सदाशिव बहीर, कारखान्याचे मुख्य अभियंता गणेश गंगणे, मुख्य रसायनशास्त्रज्ञ नानासाहेब पाटोळे, डिस्टिलरी मॅनेजर अरुण पाटील, मुख्य लेखापाल गोपाळ चव्हाण, शेती अधिकारी गणेश भोसले, सिव्हिल इंजिनिअर पी. डी. काळे, कार्यालयीन अधीक्षक सूर्यकांत सावंत यांच्यासह अधिकारी, कर्मचारी, कामगार आणि सभासद उपस्थित होते.

## लातूर जिल्ह्यात ३० सप्टेंबर रोजी महात्मा फुले महसूल लोकअदालत

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २७ सप्टेंबर : राज्य शासनाच्या महसूल व वन विभागाच्या निर्दे शानुसार महसूल न्यायालयांमधील प्रलंबित प्रकरणे जलदगतीने आणि सामोपचाराने निकाली काढण्यासाठी संपूर्ण लातूर जिल्ह्यात बुधवार, ३० सप्टेंबर २०२६ रोजी 'महात्मा फुले महसूल लोकअदालत' अभियानाचे आयोजन करण्यात येत आहे.

लातूरचे जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांच्या निर्दे शानुसार आणि अपर जिल्हाधिकारी श्रीमती शिल्पा करमकर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा, उपविभाग, तालुका आणि मंडळ स्तरावर ही महसूल लोकअदालत पार पडणार आहे.

महसूल विभागातील प्रलंबित दाव्यांमुळे संबंधित पक्षकारांचा होणारा वेळेचा, श्रमाचा आणि आर्थिक अपव्यय टाळण्यासाठी तसेच परस्पर संमती व तडजोडीच्या माध्यमातून हे वाद कायमस्वरूपी मिटवण्याच्या उद्देशाने या उपक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे.

# लातुरात बँक कर्मचाऱ्यांनी पाळला 'काळा दिवस'!



तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २७ सप्टेंबर : राष्ट्रीयकृत बँकांच्या कर्मचाऱ्यांनी रविवारी बँका चालू ठेवण्याच्या निर्णयाचा निषेध व्यक्त करण्यासाठी बँका चालू ठेवून आरबीआयच्या निर्णयाची अमलबजावणी केली. मात्र, संप मोडून काढण्याच्या शासनाच्या प्रयत्नाचा निषेध म्हणून काळे ड्रेस परिधान करून काळा दिवस पाळला . लातूरमधील बँक अधिकारी - कर्मचाऱ्यांनीहीहा काळा दिवस पाळून आपला सक्रिय पाठींबादर्शविला . बँक कर्मचाऱ्यांनी दि. २८, २९ व ३० सप्टेंबर रोजी पाच दिवसांचा आठवडा या मागणीसाठी देशभरात संपाची हाक दिलेली आहे. देशभरातील साडेआठ लाख कर्मचारी संपामध्ये सहभागी होत असून २६ व २७ सप्टेंबर २०२६ रोजी बँकांना सुट्ट्या असल्यामुळे सलग पाच दिवस बँका बंद राहण्याची शक्यता होती. त्यामुळे संपाचा परिणाम खूप मोठा साधला जाणार होता. परंतु देशभरातील सर्व कामगार संघटना व वेगवेगळी आंदोलने वेगवेगळ्या पद्धतीने मोडीत काढू पाहत असलेल्या केंद्र सरकारने संपाची दाहकता कमी करण्यासाठी जाणीवपूर्वक रविवार २७ सप्टेंबर रोजी बँका सुरू करण्याचा निर्णय रिझर्व बँकेच्या माध्यमातून प्रसारित केला. ज्यामुळे बँका पाच दिवसांच्या ऐवजी आता सलग तीन दिवसच बंद राहतील. आपल्या हातातील प्रशासकीय यंत्रणांचा वापर करून हे एक प्रकारे संपाची दाहकता कमी करण्याचा व संप मोडून काढण्याचा केंद्र सरकारकडून झालेला प्रयत्न आहे. याचा निषेध म्हणून देशभरात बँक कर्मचाऱ्यांनी रविवार २७ सप्टेंबर रोजी काळा दिवस पाळला. अनेक शाखा मध्ये सर्व कर्मचाऱ्यांनी काळे ड्रेस परिधान करून दिवसभर बँकेचे कामकाज केले. युद्ध -कोविड - महामारी यासारख्या एखाद्या आपत्कालीन परिस्थितीमध्ये बँका सुट्टी दिवशी सुरू करता येऊ शकतात. परंतु देशांमध्ये सध्या तशी कोणतीही परिस्थिती नसताना व अगदी कोविड सारख्या महामारीच्या काळात सुद्धा रविवारी बँका उघड्या ठेवण्याची गरज लागलेली नसताना जाणीवपूर्वक बँक कर्मचाऱ्यांच्या संपाची दाहकता कमी करण्यासाठी रविवारी सर्व बँका उघडण्याचा आदेश रिझर्व बँक ऑफ इंडिया व त्या त्या बँकामार्फत देण्यात आलेला आहे. हा एक प्रकारे कर्मचाऱ्यांच्या भावनाशी खेळण्याचा प्रकार असून संघटनांना या माध्यमातून केंद्र सरकार अप्रत्यक्षरीत्या आव्हान देत आहे. प्रशासकीय अधिकारांचा केंद्र सरकारकडून वापर होत असून त्याचाच भाग म्हणून रिझर्व बँकेच्या मार्फत रविवारी बँक सुरू करण्याचा आदेश त्यांनी निर्गमित केलेला आहे. मान्य केलेली पाच दिवसांच्या आठवड्याची मागणी लागू न करता उलट रविवारी बँका सुरू करण्याचा निर्णय घेऊन बँक कर्मचाऱ्यांची व त्यांनी पुकारलेल्या संपाची मुस्कटदाबी करण्याचा प्रयत्न या निमित्ताने सरकारकडून होतो आहे याचा निषेध म्हणून सर्व कर्मचाऱ्यांनी काळा दिवस पाळण्याचे ठरविले जा अंतर्गत देशभरातील सर्व राष्ट्रीयकृत बँकांच्या सर्व शाखांमध्ये कर्मचाऱ्यांनी काळे ड्रेस घालून बँकेचे कामकाज पूर्ण केले.

## प्राचार्य डॉ. डोंगरगे यांना सेवामुक्त करण्याच्या मागणीसाठी उपोषण

### न्यायालयाचा आदेश डावलून सेवेत कायम न करता छळ केल्याची तक्रार

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २७ सप्टेंबर : लातूरच्या औद्योगिक न्यायालयाने सन २००८ मध्येच सेवेत कायम करण्याचे आदेश दिलेले असतानाही महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सिद्रामप्पा डोंगरगेयांनी सेवेत कायम न करता आपल्यावर सातत्याने अन्याय केला आहे. आपली आर्थिक व मानसिक पिळवणूक केली आहे. अशा दोषी प्राचार्यांना २४ तासांच्या आत सेवामुक्त करण्यात यावे, या मागणीसाठी पीडित सेवक संतोष अमृत राठोड यांनी सोमवार, दि. २८ सप्टेंबर २०२६ पासून महाविद्यालयासमोर बेमुदत उपोषणास बसण्याचा इशारा दिला आहे.

लातूरच्या शिक्षण क्षेत्रात चालणाऱ्या अनागोंदी कारभारामुळे लातूर पॅटर्नचागवगवा मागच्या काही दिवसात कमालीचा कमी झाला असल्याचे दृष्टीपथास येत आहे. श्री महात्मा बसवेश्र्वर शिक्षण संस्थेच्या अंतर्गत वाद - विवाद आणि मतभेदाने पुन्हा एकदा डोके वर काढल्याचे सर्वज्ञात आहे. कार्यकारी मंडळाला विश्र्वासात न घेता मनमानी कारभार करणाऱ्या तत्कालीन सचिवांना, माधवराव पाटील टाकळीकर यांना संस्थेचे उपाध्यक्ष माधवराव पाटील तपसेचिंचोलीकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या सभेत सचिव पदावरून पदच्युत करण्यात आले आहे. टाकळीकरांच्याजागेवर नूतन सचिव म्हणून बसवराज उर्फ राजू येरटे यांची नियुक्ती करण्यात आली आहे, या बाबी आता लातूरच्या शिक्षण क्षेत्रापासून लपून राहिलेल्या नाहीत. महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सिद्रामप्पा डोंगरगेयांच्याविरुद्धएकापेक्षा अधिक गुन्हे दाखल असल्याने त्यांच्यावर प्राचार्यपदाचीजबाबदारी सोपविणेचशैक्षणिक दृष्ट्या चुकीचे आहे. मात्र, पदच्युत सचिव टाकळीकर यांच्या पुढाकाराने डोंगरगे यांच्यावर पूर्णवेळ प्राचार्य पदाची जबाबदारी सोपविलीगेली आहे. डोंगरगेयांना टाकळीकरांचेपूर्ण समर्थन असल्यानेच त्यांनीऔद्योगिक न्यायालयाचा संतोष राठोड यांना सेवेत कायम करण्याचा आदेश असूनही त्यांना अद्याप कायम केलेले नाही. आजही संतोष राठोड केवळ नऊ हजार रुपये मानधनावर काम करत आहेत. आपल्या कुटुंबाचा चरितार्थ या अल्प वेतनात भागविणे कठीण आहे. आपल्याला किमान वेतन कायद्याप्रमाणे तरी वेतन मिळावे,अशी आग्रही मागणी करूनही त्याकडे प्राचार्यानी दुर्लक्ष केल्याचा आरोप राठोड यांनी केला आहे.प्राचार्य डोंगरगेयांनी आपली आर्थिक व मानसिक पिळवणूक करून आपल्याविरुद्ध अनफेअर लेबर प्रॅक्टिस केली आहे. अनफेअर लेबर प्रॅक्टिस कायदा १९७१ या नियमांतर्गत येतो. या नियमान्वये न्याय मागण्यासाठी औद्योगिक न्यायालयात प्रकरण दाखल केले असताना न्यायालयाने मला सेवेत कायम करावे व थकीत वेतनाची थकबाकी देण्याचा आदेश पारित केला आहे. त्याची अंमलबजावणी करण्यास प्राचार्य डोंगरगेतयार नाहीत. या मागणीसाठी आपण त्यांना वेळोवेळी विनंती केल्याचेही राठोडयानीतक्रार अर्जात नमूद केले आहे. न्यायालयाचा आदेश डावलून सेवक संतोष राठोड यांना सेवेत कायम न करणाऱ्या प्राचार्य डोंगरगे यांना २४ तासांच्या आत सेवामुक्त करण्याची मागणी राठोड यांनी लावून धरली आहे. डोंगरगेयांच्या सेवामुक्तीशिवायआपले उपोषण मागे घेणार नसल्याचा निर्वाळाही संतोष राठोड यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात दिला आहे. मागच्या १९ वर्षांपासून बसवेश्र्वर महाविद्यालयात अल्प वेतनावर राबणाऱ्या राठोड यांच्यावर होणाऱ्या या अन्यायाबद्दल समाजातूनही आता चीड व्यक्त होताना दिसत आहे. न्यायालयाच्या आदेशाचे पालन करण्यास एकापेक्षा अधिक गुन्हे दाखल असलेला प्राचार्यच तयार नसल्याचे पाहून शिक्षण प्रेमींमध्ये महात्मा बसवेश्र्वर शिक्षण संस्थेच्या एकूणच कार्यपद्धतीबद्दल संताप व्यक्त होत आहे. पदाधिकाऱ्यांबरोबरचया संस्थेतील कर्मचारीहीमनमानी वागतानाआढळून येत आहेत. त्यामुळे किमान न्यायालयाच्या आदेशाचा अवमान तरी या संस्थेच्या पदाधिकारी आणि कर्मचाऱ्यांकडून होऊ नये,अशी अपेक्षाही व्यक्त केली जात आहे. आपल्या मागणीच्या निवेदनाच्या प्रति राठोड यांनी राज्यपाल, कुलगुरू, शिक्षण सहसंचालक नांदेड, जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, प्राचार्य , कामगार नेत्यांनाहीपाठविल्याआहेत.

## वीज ग्राहकांनी २८ सप्टेंबरपूर्वी वीजबिल ऑनलाईन भरण्याचे महावितरणचे आवाहन

### बँक कर्मचाऱ्यांनी पुकारलेल्या संपाचा परिणाम

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २७ सप्टेंबर: बँक कर्मचाऱ्यांच्या संपाच्या पार्श्र्वभूमीवर वीजग्राहकांनी २८ सप्टेंबरपूर्वी वीजबिल ऑनलाईन भरावे आणि गैरसोय टाळावी, असे आवाहन महावितरणतर्फे करण्यात आले आहे.

२८ ते ३० सप्टेंबर या कालावधीत बँक कर्मचाऱ्यांनी संपाचा इशारा दिल्याने बँकिंग व्यवहारांवर परिणाम होण्याची शक्यता आहे. अनेक वीज ग्राहक आपले वीजबिल धनादेशाद्वारे भरतात. त्यामुळे या कालावधीत वीजबिल भरणा व संकलन प्रक्रियेवर परिणाम होऊ शकतो. ज्या वीज ग्राहकांची प्रॉम्प्ट पेमेंट (तत्पर देयक भरणा) तसेच ड्यू डेट (अंतिम भरणा दिनांक) २८ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर या कालावधीमधील असेल अशा सर्व ग्राहकांनी गैरसोय टाळण्यासाठी शक्यतो ऑनलाइन पद्धतीने वीजबिल भरावे. महावितरणची अधिकृत वेबसाईट, मोबाईल प तसेच उपलब्ध डिजिटल पेमेंट सुविधांचा वापर करून घरबसल्या वीजबिलाचा भरणा २८ सप्टेंबरपूर्वी करावा. तसेच, प्रॉम्प्ट पेमेंट डिस्काउंटचा लाभ घेण्यासाठी तसेच विलंब आकार टाळण्यासाठी ग्राहकांनी देय तारखेपूर्वी वीजबिल भरावे. लातूर परिमंडलांतर्गत लातूर, धाराशिव व बीड मंडलातील बहुसंख्य ग्राहक प्रॉम्प्ट पेमेंट डिस्काउंटचा लाभ घेत आहेत. त्यामुळे ग्राहकांनी ऑनलाइन पद्धतीने वेळेत वीजबिल भरून सवलतीचा लाभ घ्यावा आणि बँक कर्मचाऱ्यांच्या संपामुळे होणारी संभाव्य गैरसोय टाळावी, असे आवाहन महावितरणने आहे.

## बहुदिव्यांग विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर फुलले आनंदाचे हास्य

### हरंगुळ येथे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणातर्फे शालेय साहित्य वाटप



तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २६ सप्टेंबर : शिक्षणाची स्वप्ने प्रत्येक मुलाच्या डोळ्यांत असतात; मात्र काही मुलांच्या या स्वप्नांना समाजाच्या खंबीर आधाराची गरज असते. याच भावनेतून बहुदिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला माणुसकीचा आधार देणारा एक अत्यंत संवेदनशील उपक्रम हरंगुळ (बु.) येथे पार पडला. लातूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण आणि आपले आरोग्य-आपलीच जबाबदारी फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने हरंगुळ (बु.) येथील संवेदना सेरब्रल पाल्सी विकसन केंद्र (बहुदिव्यांग मुलांची शाळा) येथील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.

हा उपक्रम जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव व्यंकटेश गिरवलकर यांच्या हस्ते झाला. वह्या, पुस्तके आणि विविध शैक्षणिक साहित्य मिळाल्यानंतर दिव्यांग विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेले आनंदाचे हास्य आणि त्यांच्या डोळ्यांतील नवचमक उपस्थितांसाठी अत्यंत भावनिक क्षण ठरला. या साहित्याच्या रूपाने विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या स्वप्नांना एक नवा आणि भक्कम आधार मिळाला आहे.

या प्रसंगी उपक्रमास संवेदना सेरब्रल पाल्सी विकसन केंद्राचे संस्थापक अध्यक्ष श्रीराम देशपांडे, सुरेश पाटील, कार्यवाह राहुल देशपांडे, संवेदना केंद्राच्या मुख्याध्यापिका दीपाताई पाटील, जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राचे समिती सदस्य वैजनाथ व्होणाले, व्यवस्थापक बसवराज पैके, दत्तात्रय परळकर, संजय राजुळे, वीरभद्र तुर्गुडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

बहुदिव्यांग विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने पुढे येऊन पुढाकार घेणे अत्यंत गरजेचे आहे. या उपक्रमातून केवळ शैक्षणिक साहित्याचे वाटप झाले नसून, तुमच्या शैक्षणिक प्रवासात संपूर्ण समाज तुमच्यासोबत आहे असा दृढ विश्र्वास विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करण्यात आला.

विशेष गरजा असलेल्या या मुलांना प्रेम, योग्य आधार आणि संधी मिळाल्यास त्यांच्या क्षमतांना नवे आकाश कवेत घेता येऊ शकते, त्यामुळे अशा विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी समाजाने संवेदनशीलतेने पुढाकार घेणे काळाची गरज आहे, असे गिरवलकर यांनी यावेळी सांगितले.

## 'सेवा संकल्प अभियानांतर्गत' जिल्ह्यातील २,५२८ शाळांमध्ये स्वच्छता अभियान उत्साहात

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २७ सप्टेंबर : शालेय विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव, स्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक बांधिलकी निर्माण करण्याच्या उद्देशाने लातूर जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाच्या वतीने १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत 'सेवा संकल्प अभियान' मोठ्या उत्साहात राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत मुख्य कार्यकारी अधिकारी राहूल कुमार मीना यांच्या मार्गदर्शनाखाली २६ सप्टेंबर २०२६ रोजी लातूर जिल्ह्यातील २,५२८ शाळांमध्ये शाळा भरण्यापूर्वी एक तास अगोदर शाळा व शाळेच्या परिसरात 'स्वच्छता अभियान' हा विशेष उपक्रम राबवून स्वच्छतेचा संदेश देण्यात आला.

लातूर तालुक्यात ३११ पैकी २९५ शाळांमध्ये हा उपक्रम राबविण्यात आला असून यामध्ये १,३४८ शिक्षक व १,५४० नागरिक सहभागी झाले, औसा तालुक्यात २८५ पैकी २७९ शाळांमध्ये उपक्रम राबवून १,३३२ शिक्षक व ८१२ नागरिक सहभागी झाले, निलंगा तालुक्यात ३३६ पैकी ३२७ शाळा सहभागी झाल्या असून ९७५ शिक्षक व ६५४ नागरिक सहभागी झाले, देवणी तालुक्यात ११७ पैकी सर्व ११७ शाळांमध्ये हा उपक्रम राबवून ६७८ शिक्षक व २६४ नागरिकांनी सहभाग घेतला, उदगीर तालुक्यात ३७१ पैकी सर्व ३७१ शाळांमध्ये मोहीम राबवली जाऊन १,०८८ शिक्षक व ९६५ नागरिक सहभागी झाले, जळकोट तालुक्यात ११६ पैकी १११ शाळांनी सहभाग घेतला असून ५२४ शिक्षक व ४५८ नागरिक सहभागी झाले, चाकूर तालुक्यात २०९ पैकी १८५ शाळांमध्ये मोहीम राबवून १,१०५ शिक्षक व ७९५ नागरिक सहभागी झाले.

अहमदपूर तालुक्यात ३०७ पैकी २९३ शाळांमध्ये उपक्रम राबवून १,७७९ शिक्षक व ६०३ नागरिक सहभागी झाले, शिरूर अनंतपाळ तालुक्यात ८६ पैकी ७६ शाळा सहभागी झाल्या असून ३१२ शिक्षक व ४२४ नागरिक सहभागी झाले, रेणापूर तालुक्यात १५९ पैकी १४३ शाळांमध्ये मोहीम राबवून ४४६ शिक्षक व ६६७ नागरिक सहभागी झाले, लातूर युआरसी १ अंतर्गत १६० पैकी १४८ शाळांमध्ये उपक्रम राबवून ४५६ शिक्षक व ७५३ नागरिक सहभागी झाले, तर लातूर युआरसी २ अंतर्गत १९९ पैकी १७८ शाळांमध्ये मोहीम राबवून ७५४ शिक्षक व ८५३ नागरिक सहभागी झाले. अशा प्रकारे संपूर्ण लातूर जिल्ह्यात एकूण २,६५१ शाळांपैकी तब्बल २,५२८ शाळांमध्ये यशस्वीरीत्या स्वच्छता अभियानाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले असून, यात एकूण १०,७९७ शिक्षक आणि ८,७८८ नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

## विलास युनिट-२ चे बॉयलर अग्निप्रदीपन

### गाळप हंगामास लवकरच सुरुवात होणार




तभा वृत्तसेवा

लातूर दि. २७ सप्टेंबर : उदगीर तालुक्यातील विलास सहकारी साखर कारखाना लि., युनिट-२ चे बॉयलर अग्निप्रदिपन कार्यक्रम शुक्रवार दि. २५ सप्टेंबर रोजी कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख यांच्या हस्ते संपन्न झाला. लवकरच गाळप हंगामास सुरुवात होणार आहे.

विलास सहकारी साखर कारखाना लि., युनिट-२ कारखान्याने हंगाम २०२५-२६ मध्ये ५ लाख मे. टन गाळप झाले असुन गाळपास आलेल्या ऊसाला प्रति मे. टन रुपये ३१३१ प्रमाणे ऊस बिल अदा केला आहे. कारखान्याने गळीत हंगाम २०२६-२७ सुरु करण्याच्या दृष्टीकोनातुन पुर्ण तयारी केली आहे. बॉयलर अग्निप्रदीपपुर्वी कारखान्याचे संचालक नितीन पाटील व त्यांचे सुविद्य पत्नी सौ. आशा पाटील यांचे हस्ते विधिवत सत्यनारायण पुजा करुन होमहवन करण्यात आले.

या प्रसंगी कारखान्याचे व्हाईस चेअरमन माजी आमदार वैजनाथराव शिंदे, कारखान्याचे संचालक सर्वश्री रविंद्र काळे, अमृत जाधव, सतिष पाटील, अनंत बारबोले, नरसिंग बुलबुले, गोवर्धन मोरे, रंजीत पाटील, तात्यासाहेब पालकर, रामराव सांळुके, दीपक बनसोडे, लताताई देशमुख, शाम बरुरे, सुभाष माने, निमंत्रीत संचालक कल्याण पाटील, ज्ञानोबा गोडभरले, मारोती पांडे, पंडित ढगे, संदिप पाटील, उदगीर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शिवाजीराव हुडे कार्यकारी संचालक ए. आर. पवार, चिफ इंजिनिअर रविकिरण सोमवंशी, मुख्य शेतकी अधिकारी श्रीराम पाटील चिफ अकौंटंट ओ. एच. चांडक, चिफ केमिस्ट बी. आर. खरात, डिस्टीलरी मॅनेजर शेख एस. ई. सिव्हिल इंजिनिअर एस. एच. देशमुख, संतोष मुंढे परिसरातील ऊस उत्पादक शेतकरी, तोडणी वाहतुक ठेकेदार, कर्मचारी आदी उपस्थित होते.

# निलंग्यात काँग्रेसने केली दुष्काळ जीआरची होळी

## शेतकरी, शेतमजूर, विद्यार्थी यांची घोर निराशा दुष्काळाचा जीआर फसवा काँग्रेसचा आरोप



तभा वृत्तसेवा

निलंगा दि. २७ सप्टेंबर : निलंगा येथे दुष्काळाच्या पार्श्र्वभूमीवर सरकारने जारी केलेल्या दुष्काळी परिस्थितीच्या शासन निर्णयाची (जीआर) काँग्रेसच्या वतीने होळी करण्यात आली. शेतकरी सध्या तीव्र कोरड्या दुष्काळामुळे भीषण आर्थिक संकटात सापडला असताना, राज्य शासन केवळ कागदी घोडे नाचवून वेळकाढूपणा करत असल्याचा घणाघाती आरोप यावेळी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अभय साळुंके यांनी केला आहे.

निलंगा तालुक्यात पावभावामुळे पिके पूर्णपणे करपून गेली आहेत. यामुळे शेतकरी आणि ग्रामीण भागातील नागरिकांसमोर पिण्याचे पाणी, जनावरांचा चारा आणि आर्थिक मदतीचे गंभीर संकट उभे ठाकले आहे. या बिकट परिस्थितीत शेतकऱ्यांवर आत्महत्या करण्याची वेळ येण्यापूर्वीच शासनाने तातडीने प्रत्यक्ष मदत जाहीर करून ती शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावी, अशी उद्विग्न मागणी आंदोलकांनी केली.

### आंदोलकांच्या प्रमुख मागण्या

दुष्काळग्रस्त भागातील सर्व शेतकऱ्यांना तातडीने थेट आर्थिक मदत दिली जावी.

सर्व बाधित क्षेत्रातील पिकांचे तात्काळ आणि अचूक पंचनामे करण्यात यावेत.

ग्रामीण भागात चारा छावण्या आणि पिण्याच्या पाण्यासाठी टँकरची तत्काळ व्यवस्था करावी.शासनाने दुष्काळ निवारणासाठी पोकळ घोषणा न करता ठोस आणि प्रभावी उपाययोजना त्वरित लागू कराव्यात, अन्यथा हे आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी याप्रसंगी दिला.

तालुका अध्यक्ष विजयकुमार पाटील, शहराध्यक्ष अजित नाईकवाडे,सुधाकर पाटील, अजित माने, अंबादास जाधव, प्रमोद मरुरे, शिराज देशमुख, महेश देशमुख, रवी किशोर कारखानीस, प्रशांत वांजरवाडे, गिरीश पात्रे, गणेश पेटकर, बालाजी सूर्यवंशी, इस्माईल मनियार, तुषार सोमवंशी, विठ्ठल पाटील आधी काँग्रेस कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

# दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शेतकरी संबंधित

# शिरूर आनंदपाळच्या बाजारपेठेतील परिस्थितीवर चर्चा



तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ दि. २७ सप्टेंबर : भारतीय जनता पक्षाच्या प्रदेश उपाध्यक्ष तथा महिला आघाडीच्या सक्रिय कार्यकर्त्या अर्चनाताई पाटील चाकूरकर यांच्याकडून २१ सप्टेंबर रोजी शिरूर आनंतपाळ येथील बरदाळे ट्रेडर्सला सदिच्छा भेट देण्यात आली याप्रसंगी त्यांचा पुष्पगुच्छ देऊन या ठिकाणी सन्मान करण्यात आला.

यानंतर या ठिकाणी भाजपचे जेष्ठ व निष्ठावन कार्यकर्ते प्रभाकर आप्पा बरदाळे यांच्या सोबत शिरूर अनंतपाळ तालुक्यातील विविध प्रश्र्नावर सविस्तर संवाद साधण्यात आला. शिरूर आनंतपाळाच्या कृषी संबंधित बाजारपेठेवर दुष्काळाचा झालेला परिणाम शेतकऱ्याची आर्थिक परिस्थिती शेतातील पिकाची झालेली अवस्था दुष्काळाची भीषणता तसेच आगामी काळातील पाणीपुरवठा आणि उपलब्ध पाणीसाठा या महत्त्वाच्या विषयावर यावेळी चर्चा झाली. आगामी काळातील पाणीटंचाईचे आव्हान आणि त्याला सामोरे जाण्यासाठी कोणत्या उपाययोजना करणे आवश्यक आहे याबाबतही विचार विनिमय करण्यात आला.

दुष्काळाची परिस्थिती चिंताजनक असली तरी शासनाच्या माध्यमातून या प्रश्र्नावर निश्र्चितच मार्ग काढला जाईल असा विश्र्वास अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी व्यक्त केला या आव्हानात्मक परिस्थितीत शासनाच्या प्रयत्नांना सर्वांनी सहकार्य करावे असे आव्हान यावेळी त्यांच्याकडून करण्यात आले.

याप्रसंगी शिरूर आनंतपाळ व्यापार असोसिएशनचे अध्यक्ष ओम प्रकाशजी गलबले उपाध्यक्ष चाकोते भाजपचे जेष्ठ कार्यकर्ते प्रभाकर आप्पा बरदाळे बाजारपेठेचे हितचिंतक शिवाजी सामनगावे बरदाळे ट्रेडर्सचे प्रोप्रायटर जगदीश बरदाळे सहाय्यक विलास तसेच इतर कार्यकर्ते उपस्थित होते या सर्वांनी चर्चेत सहभाग नोंदवत तालुक्यातील सध्या स्थिती आणि आगामी आव्हानात्मक परिस्थिती बाबत आपली मते मांडली. संवादाच्या अंतिम भागात जनतेने दुष्काळाला घाबरण्याचे कारण नाही संकट कितीही मोठे असले तरी सरकार आपल्या सोबत राहील असा त्यांच्याकडून या ठिकाणी शब्द देण्यात आला अशी माहिती बरदाळे ट्रेडर्सचे प्रोप्रायटर जगदीश बरदाळे यांच्याकडून तरुण भारत शी संवाद साधत असताना अशा प्रकारची माहिती देण्यात आली.

# सामाजिक दायित्व जोपासण्यासाठी रोटरी क्लब नेहमीच अग्रेसर : वेदपाठक



तभा वृत्तसेवा

उदगीर दि. २७ सप्टेंबर : अलीकडच्या काळात माणूस मी आणि माझे यातच गुरफटून चालला आहे. अशा काळात सामाजिक दायित्व जोपसण्यासाठी रोटरी क्लब नेहमीच अग्रेसर असते असे मत प्रसिद्ध साहित्यिक श्रीहरी वेदपाठक यांनी केले.

रोटरी क्लब ऑफ उदगीर सेंट्रल च्या वतीने 'स्व. भीमाशंकर पारसेवार व स्वातंत्र्यसेनानी स्व. दत्तूगीर तोंडचिरकर' यांच्या स्मरणार्थ देण्यात येणाऱ्या 'राष्ट्राचे शिल्पकार पुरस्काराचे' वितरण श्रीहरी वेदपाठक यांच्या हस्ते शनिवारी (दि. २६ रोजी ) एका कार्यक्रमात करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रोटरी क्लब ऑफ उदगीर सेंट्रलचे अध्यक्ष ऍड. विक्रम संकाये होते. व्यासपीठावर रोटरी क्लब ऑफ उदगीर सेंट्रलचे उपाध्यक्ष विजयकुमार पारसेवार, सचिव डॉ. सुधीर जाधव, प्रोजेक्ट चेअरमन सुयश बिरादार यांची उपस्थिती होती.

यावेळी सेवानिवृत्त शिक्षक रमाकांत बनशेळकीकर यांचा जीवन गौरव पुरस्काराने सन्मान करण्यात आला. तर सुरेखा कुलकर्णी, वर्षा मुस्कावाड, कल्पना बिरादार, गणपत गादगे, तुळशीदास बिरादार या शिक्षकांचा राष्ट्राचे शिल्पकार या पुरस्काराने सन्मान करण्यात आला.

यावेळी बोलताना श्रीहरी वेदपाठक यांनी अलीकडे आपण आत्मकेंद्री होत चाललो आहोत अशी खंत व्यक्त करून माणसाने आत्मकेंद्री न राहता समाजाचा विचार करून वागण्याची गरज प्रतिपादित केली. सामाजिक दायित्व बाळगत समाजाला काही तरी देण्याची भूमिका ठेवल्यास समाजाची उन्नती अधिक गतीने होईल असे सांगून माणसाने कृतघ्न न होता नेहमीच कृतज्ञ राहूनच काम करावे असेही त्यांनी यावेळी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुयश बिरादार यांनी केले. मानपत्राचे वाचन विक्रम हलकीकर यांनी केले. सूत्रसंचालन विशाल तोंडचिरकर व विशाल जैन यांनी केले. आभार डॉ. सुधीर जाधव यांनी मानले. कार्यक्रमासाठी महानंदा सोनटक्के, प्रा. अन्नपूर्णा मुस्तादर, मंगला विश्र्वनाथे, सरस्वती चौधरी, प्रशांत मांगुळकर, संतोष फुलारी, प्रमोद शेटकार, निशांत धवलशंख, मोतीलाल डोईजोडे, व्यंकटराव कणसे, शिवाजी दुडूकनाळे, अजय अंबेसंगे यांच्यासह रोटरी सदस्यांनी पुढाकार घेतला.

# विजयकुमार कोरे सरांचा मित्रपरिवाराकडून गौरव

तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ दि. २७ सप्टेंबर : जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्या वतीने सन २०२३-२४ चा जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त झालेले शिक्षक विजयकुमार सदाशिव कोरे यांचा मित्रपरिवाराच्या वतीने शाल, फेटा, श्रीफळ व पुष्पहार देऊन गौरव करण्यात आला.

कोरे सरांनी शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी केलेले प्रयत्न, नाविन्यपूर्ण उपक्रम आणि विद्यार्थ्यांप्रती असलेली तळमळ यामुळे त्यांचे कार्य इतर शिक्षकांसाठी प्रेरणादायी ठरले आहे.

पुरस्काराच्या निमित्ताने आयोजित या सत्कार सोहळ्याचे नियोजन संदिप धुमाळे, यांनी केले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी कोरे सरांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी रोहिणा येथील नुकसानग्रस्त भागाची पाहणी करून शेतकऱ्यांना दिला धीर



तभा वृत्तसेवा

चाकूर दि. २७ सप्टेंबर : महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांनी चाकूर तालुक्यातील रोहिणा येथे दुष्काळी परिस्थितीमुळे नुकसान झालेल्या पिकांची प्रत्यक्ष शेताच्या बांधावर जाऊन पाहणी केली.यावेळी पीक परिस्थिती, नुकसानीचे स्वरूप आणि शेतकऱ्यांच्या अडचणींचा सविस्तर आढावा त्यांनी घेतला.

पाहणीदरम्यान शेतकऱ्यांनी पिकांचे नुकसान, पावसाची कमतरता तसेच विविध अडचणी मांडल्या. त्यांच्या समस्या जाणून घेत शेतकऱ्यांना शासन त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे असल्याचे आश्र्वस्त केले. तसेच प्रतिकूल परिस्थितीत शेतकऱ्यांनी खचून न जाता संयम राखावा आणि कोणतेही टोकाचे पाऊल उचलू नये, असे आवाहन केले.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रावहिनी अजितदादा पवार हे लवकरच दुष्काळाबाबत निर्णय जाहीर करणार आहेत, शासनाच्या नियमानुसार दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांना विविध सवलती व मदतीच्या योजना उपलब्ध करून देण्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचे सांगितले.

दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांना आवश्यक ती मदत मिळवून देण्यासाठी शासनाच्या माध्यमातून सर्वतोपरी प्रयत्न केले जातील, अशी ग्वाहीही यावेळी दिली. यावेळी जिल्हा परिषद उपाध्यक्ष दयानंद सुरवसे, भानुदास पोटे,जिल्हा परिषद सदस्या उषा कांबळे, पंचायत समिती सदस्य संतोष कलवले, सुदर्शन मुंडे,अनील वाडकर,राम कसबे,संदीप शेटे, मच्छिंद्र नागरगोजे,पपन कांबळे सह लोकप्रतिनिधी,महसूल, कृषी तसेच ग्रामविकास विभागातील संबंधित अधिकारी उपस्थित होते.

# जिल्हा परिषद अध्यक्षनी जाणून घेतल्या मंडळ विभागातील अडचणी तात्काळ उपायोजना करण्याच्या प्रशासनाला सूचना



तभा वृत्तसेवा

वलांडी दि. २७ सप्टेंबर : उपलब्ध पाण्यासाठी राखीव ठेवून ग्रामस्थांना धीर..! गावातील उपलब्ध खाजगी पाणीसाठे अधिग्रहण करण्याच्या प्रशासनाला सूचना वलांडी येथे तात्काळ निर्माण झालेली पाणीटंचाई दूर करण्यासाठी प्रशासनाला आदेश यावेळी जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा उषाताई संभाजी पाटील तळेगावकर यांनी सांगितले की केवळ ही वलांडी महसूल मंडळापूर्तीचा पाणीटंचाईचा किंवा प्रश्र्न नसून संपूर्ण लातूर जिल्ह्यात हीच परिस्थिती आहे या परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी जिल्हा प्रशासनास, आवश्यक त्या सूचना देण्यात आले असून ही नैसर्गिक आपत्ती असून या आपत्तीवर मात करण्यासाठी सर्वांनी कोरोना काळात ज्या पद्धतीने सामूहिकरीत्या या आपत्तीला आपण सामोरे गेलो त्याच पद्धतीने ही परिस्थिती आपण सर्वांनी हाताळण्यासाठी मदत करावी व या भागातील सामाजिक संघटना ग्रामस्थ दानशूर व्यक्तीने सामोरे येऊन या आपत्तीतून सर्वसामान्य नागरिकांना दिलासा देण्यासाठी प्रयत्न करावा असे आवाहन यावेळी जिल्हा परिषद अध्यक्षा उषाताई पाटील तळेगावकर यांनी व्यक्त केले. यावेळी वलांडी गावातील ग्रामस्थ शेतकरी शेतमजूर मोठ्या संख्येने उपस्थित होते यावेळी वलांडी ग्रामस्थांनी वलांडी येथे निर्माण झालेल्या पाणीटंचाई सोबत उपयोजना करण्याचे निवेदन सादर केले.

यावेळी वलांडी वलांडी येथील सामाजिक कार्यकर्ते अरुण पाटील, ईश्र्वर बदनाळे, अमन पठाण, हैदर मल्लेवाले, सोमनाथ उमाटे, जगदीश कणजे, माधव बदनाळे, अनिकेत कासनाळे, सोमनाथ सजनशेट्टी, योगेश डिघोळे, अधिराज बदनाळे, सलीम पटेल, संगमेश्र्वर उमाटे यांच्यासह ग्रामस्थांची उपस्थिती होती.

# मंजुरी मिळाली; आता जागेचा प्रश्न सोडवा : शेरे

तभा वृत्तसेवा

वलांडी दि. २७ सप्टेंबर : देवणी तालुक्यातील जवळगा व दवणहिप्परगा येथे प्राथमिक आरोग्य केंद्रांना मंजुरी मिळाल्यानंतरही आवश्यक जागेचा प्रश्र्न प्रलंबित असल्याने प्रत्यक्ष उभारणीला अपेक्षित गती मिळत नसल्याचा मुद्दा जिल्हा परिषद सदस्य रामलिंग शेषेराव शेरे यांनी जिल्हा परिषदेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत लावून धरला. मंजूर आरोग्य केंद्रांची कामे केवळ जागेअभावी रखडू नयेत, यासाठी प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी, अशी जोरदार मागणी त्यांनी केली.

माजी मंत्री तथा आमदार संभाजी पाटील निलंगेकर व युवा नेते अरविंद पाटील निलंगेकर यांच्या माध्यमातून व पाठपुराव्यामुळे जवळगा आणि दवणहिप्परगा येथे प्राथमिक आरोग्य केंद्रांना मंजुरी मिळाली आहे. ग्रामीण भागातील नागरिकांना गावाच्या परिसरातच प्राथमिक आरोग्य सेवा उपलब्ध व्हावी, हा त्यामागील उद्देश आहे.

मात्र, मंजुरीनंतर आवश्यक जागा उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया पूर्ण न झाल्याने पुढील कामांवर परिणाम होत असल्याचे शेरे यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले.

यावेळी बोलताना जि.प. सदस्य रामलिंग शेरे म्हणाले जवळगा येथील गावठाण हद्दीत उपलब्ध असलेल्या शासकीय जमिनीवरील अतिक्रमण हे नियमानुसार हटवून संबंधित जागा तात्काळ आरोग्य विभागाकडे हस्तांतरित करावी.

तसेच दवणहिप्परगा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी आवश्यक असलेली शासकीय जागा निश्र्चित करून ती उपलब्ध करून देण्याची कार्यवाही तातडीने करावी.

जागेचा प्रश्र्न सोडविण्यासाठी महसूल विभाग, ग्रामपंचायत, जिल्हा प्रशासन आणि आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक घेऊन कार्यवाहीला कालमर्यादा निश्र्चित करावी, अशी सूचना त्यांनी केली.

शेरे पुढे म्हणाले, दोन्ही प्राथमिक आरोग्य केंद्रांना मंजुरी मिळाली आहे. आता जागेचा प्रश्र्न तातडीने निकाली काढून प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली पाहिजे. हा प्रश्र्न जवळगा व दवणहिप्परगा परिसरातील नागरिकांच्या आरोग्य सुविधांशी थेट संबंधित आहे. मंजुरीनंतर प्रशासकीय प्रक्रिया लांबू नये आणि नागरिकांना आरोग्य सुविधांसाठी दूरच्या ठिकाणी जाण्याची वेळ येऊ नये, यासाठी समन्वयाने निर्णय घेण्याची गरज आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्रांची उभारणी झाल्यास जवळगा, दवणहिप्परगा तसेच परिसरातील १०-१२ गावांतील नागरिकांना प्राथमिक उपचार, मातृ-बाल आरोग्य सेवा, लसीकरण आणि इतर आरोग्य सुविधा स्थानिक पातळीवर उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे मंजुरीपासून प्रत्यक्ष उभारणीपर्यंतची प्रक्रिया वेगाने पूर्ण करावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# रयत क्रांती संघटनेचे प्रदेशाध्यक्ष सागर खोत यांच्याकडून दुष्काळी भागाचा दौरा



तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ दि. २७ सप्टेंबर : यंदाच्या वर्षी खरीप हंगामात अत्यल्प पाऊस पडला गेली दोन महिन्यांपासून पावसाने प्रदिर्घ काळ खंड दिल्याने सोयाबीन पिकाचे क्षेत्र नगदी पैसे मिळवून देण्याचे प्रमुख पीक असून यासोबत सर्वच पीक करपून उध्वस्त झाल्याने याची पाहणी करण्यासाठी रयत क्रांती संघटनेचे प्रदेशाध्यक्ष सागर भाऊ खोत यांनी येरोळ. साकोळ. श्रीरामपूर परिसरामध्ये शेत पिकाची पाहणी केली.

यावेळी अनेक शेतकऱ्यांनी सोयाबीन सह सर्वच पिके करपून गेली, त्यामुळे शेताकडे फिरकावे सुध्दा वाटत नाही वर्षभर कुटूंबाचा गाढा कसा ओढायचा,मुलांच शिक्षण,लग्न,वध्द आई वडीलांचा दवाखाना कशाने करायचा पशूधन चारा अभावी उपाशी मरत आहेत आशा समस्या याप्रसंगी शेतकऱ्यांनी खोत यांच्या कडे मांडल्या.

यावेळी सागर खोत म्हणाले आमच्या कार्यकर्त्यांनी मला या समस्या सांगितल्या या करिता मी दुष्काळी परिस्थिती पाहाण्याकरिता शिरुर अनंतपाळ तालुक्यात आलो शेतकऱ्यांचे प्रचंड मोठे नुकसान झाले शेतकऱ्यांवर मोठे आर्थिक संकट ओढवले असून निश्र्चितच आमदार सदाभाऊ खोत यांच्या माध्यमातून सरकार कडे या समस्या मांडून या भागातील शेतकऱ्यांना सर्वतोपरी शक्य तेवढी मोठी आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे दैनिक तरूण भारत शी संवाद साधत असताना ही माहिती दिली.

याप्रसंगी या ठिकाणी प्रदेश उपाध्यक्ष राहुल मोरे, मराठवाडा अध्यक्ष शिवाजी पेटे, अध्यात्मिक प्रदेश अध्यक्ष बालाजी महाराज येरोळकर, जिल्हा अध्यक्ष गणेश सुर्यवंशी, गुडेराव चौसष्ट यांच्या सह कार्यकर्ते पदाधिकारी स्थानिक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

# खा. रामराव वडकुते यांनी केली पार्डी, कुंभारवाडी येथे पिकांची पाहणी

## शेतकऱ्यांशी साधला संवाद, सरकार सर्वतोपरी मदत करणार- वडकुते



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २७ सप्टेंबर**

कळमनुरी तालुक्यातील पार्डी आणि कुंभारवाडी येथे राज्यसभा खासदार डॉ. रामराव वडकुते यांनी शेतकऱ्यांची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांच्या शेतातील पिकांची पाहणी केली. यावेळी शेतकऱ्यांशी संवाद साधून शेतीची सद्यस्थिती, पिकांची अवस्था, पावसाची परिस्थिती तसेच शेतीसमोरील विविध अडचणी जाणून घेण्यात आल्या. यावेळी बोलतांना केंद्र व राज्य सरकार शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत करणार असून शेतकऱ्यांनी खचून न जाता धीराने काम करावे असे आवाहनही यावेळी खा. वडकुते यांनी केले.

खा. डॉ. रामराव वडकुते यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पिकांची प्रत्यक्ष पाहणी केली. पिकांची वाढ, उत्पादनाची स्थिती आणि हवामानाचा शेतीवर होणारा परिणाम याबाबत शेतकऱ्यांकडून माहिती घेतली. यावेळी शेतकऱ्यांनी आपल्या विविध समस्या व अडचणी त्यांच्यासमोर मांडल्या.

शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे शासन व प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक असल्याचे सांगत, अडचणीच्या काळात शेतकऱ्यांनी खचून जाऊ नये, असा धीर खा. डॉ. वडकुते यांनी दिला. शेतकऱ्यांच्या समस्या संबंधित विभागाच्या निदर्शनास आणून देऊन आवश्यक ती मदत व उपाययोजनांसाठी पाठपुरावा करण्यात येईल, असे आश्वासन त्यांनी दिले.

या वेळी भाजप जिल्हाध्यक्ष मा. गजाननदादा घुगे, माजी खासदार शिवाजीराव माने, संजय कावडे, शशिकांत वडकुते यांच्यासह तुकाराम मस्के, पंजाबराव मस्के, मुकाडे तसेच पार्डी येथील अनेक शेतकरी बांधव उपस्थित होते.उपस्थित मान्यवरांनी व शेतकऱ्यांनी शेतीची सद्यस्थिती आणि स्थानिक प्रश्नांवर चर्चा केली. शेतकऱ्यांच्या अडचणी प्रत्यक्ष जाणून घेऊन त्यावर योग्य ती कार्यवाही करण्यासाठी प्रशासनाशी समन्वय साधण्याबाबतही चर्चा करण्यात आली.

शेतकरी हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असून, शेतकऱ्यांच्या सुख-दुःखात सहभागी होऊन त्यांच्या प्रश्नांसाठी ठामपणे उभे राहणे हीच खरी जनसेवा आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठी सातत्याने प्रयत्नशील राहण्याचा विश्वास यावेळी देण्यात आला. शेतकरी हा अन्नदाता आहे. त्याच्या कष्टाला न्याय मिळवून देण्यासाठी आणि त्याच्या अडचणी सोडविण्यासाठी सदैव प्रयत्नशील राहू असे आश्वासन दिले.

# जिल्ह्यातील पाचही तालुके दुष्काळग्रस्त यादीत

## बारा उपाययोजना व सवलती लागू

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २७ सप्टेंबर**

राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ सदृश्य परिस्थिती असून या तालुक्यातील शेतकरी, विद्यार्थी, शेतमजूर, नागरिक आणि पशुधनाला दिलासा देण्यासाठी बारा उपाययोजना व सवलती लागू करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. यामध्ये हिंगोली जिल्ह्यातील सर्व तालुक्यांचा समावेश आहे. हिंगोली, औंढा नागनाथ, कळमनुरी, सेनगाव आणि वसमत या तालुक्यांमधील परिस्थितीबाबत तत्काळ पंचनामे करावेत, असे निर्देश शासनाने दिले आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार पालकमंत्री नरहरी झिरवाळ, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी नुकतेच शेतकऱ्यांच्या बांधांवर जाऊन वेगवेगळ्या ठिकाणी पीक पाणीची पाहणी केली. या दरम्यान शेतकरी बांधवांशी आस्थेवाईकपणे संवादही साधला. तसेच या दुष्काळी परिस्थितीबाबत शासन तातडीने निर्णय घेईल, असे त्यांनी आश्वस्थ केले होते. त्या अनुषंगाने आज दुष्काळ व्यवस्थापन संहिता २०१६ नुसार राज्यातील दुष्काळी परिस्थितीत सवलती आणि उपाययोजनांबाबतचा शासन निर्णय जाहीर करण्यात आला.

जून ते आज पर्यंतच्या कालावधीतील पर्जन्याची तूट व अन्य घटकांनी प्रभावित झालेल्या हिंगोली जिल्ह्यातील हिंगोली, औंढा नागनाथ, कळमनुरी, सेनगाव आणि वसमत या सर्व पाचही तालुक्यांमध्ये दुष्काळाबाबतच्या ढअॅळससशअॅ- १ (प्रथम कळ) अनुषंगाने पंचनामे करण्यात येणार आहेत. सर्वेक्षण केलेल्या क्षेत्रातील पिकांची स्थिती दर्शवणारे छायाचित्र व जीपीएस कोऑर्डीनेट संकलन करून पीक परिस्थितीचा अहवाल तयार करण्यात येणार आहे.

दुष्काळग्रस्त भागात विशेष बाब म्हणून उपाययोजना व सवलती लागू करण्यात येणार आहेत. यामध्ये जमीन महसूलात सूट, पीक कर्जाचे पुनर्गठन, शेतीशी निगडीत कर्जाच्या वसूलीस स्थगिती, कृषी पंपाच्या चालू विजबिलात सूट (७.५ हॉर्सपावर पर्यंत क्षमतेच्या विजपंपाचे वीज बिल अगोदरच माफ करण्यात आले आहे. त्यावरील वीज पंपांना सदर सूट लागू असेल), शाळा व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी, रोहयो अंतर्गत कामाच्या निकषात शिथिलता आणून जास्तीत जास्त कामे सुरु करणे, आवश्यक तेथे पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी टँकर्सचा वापर, टंचाई जाहीर केलेल्या गावात शेतक-यांच्या शेतीच्या पंपाची वीज खंडीत केली जाणार नाही, शेतीवर अवलंबून शेतकरी, शेतमजूर यांच्यासाठी अन्नधान्याचा पुरेसा पुरवठा, टंचाई होणार नाही याबाबत व्यवस्था उभी करणे, जनावरांना आवश्यक चारा उपलब्ध होईल याची व्यवस्था करणे, जलसंधारणाची कामे सुरु करणे, अगोदरच निर्गमित करण्यात आलेले शासन निर्देशाप्रमाणे पिण्याचे पाणी आणि जनावरांसाठी पाण्याचे नियोजन करणे या उपाययोजनांचा समावेश आहे.

# वसई येथे सेवा संकल्प अभियानांतर्गत विविध उपक्रम व मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २७ सप्टेंबर**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संविधानिक पदावरील कारकीर्दीला २५ वर्षे पूर्ण झाल्याचे औचित्य साधून संपूर्ण महाराष्ट्रात १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत 'सेवा संकल्प अभियान' राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान' आणि विविध लोककल्याणकारी योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीला गती देण्याचे प्रशासकीय निर्देश देण्यात आले आहेत.

शासन निर्णय (सामान्य प्रशासन विभाग, दि. ९ सप्टेंबर २०२६), ग्रामविकास विभाग (दि. १६ सप्टेंबर २०२६) आणि जिल्हा परिषद, मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या आदेशानुसार (दि. २२ सप्टेंबर २०२६) जिल्ह्याभरात विविध उपक्रम राबवले जात आहेत.

याच पार्श्वभूमीवर, आज दिनांक २६ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ठीक ०७ वाजता जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुधीर ठोंबरे यांनी औंढा नागनाथ तालुक्यातील ग्रामपंचायत मौजे वसई येथे प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली व ग्रामस्थांना मोलाचे मार्गदर्शन केले.

ग्रामपंचायत मौजे वसई येथे 'सेवा संकल्प अभियाना'अंतर्गत 'सेवा माझे योगदान' या मोहिमेखाली विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. गावात स्वच्छता मोहीम राबवून प्लास्टिकमुक्त गाव करण्यासाठी ग्रामस्थांमध्ये जनजागृती करण्यात आली. पर्यावरण संवर्धन व हरित गावाच्या ध्येयाने परिसर वृक्षारोपण करण्यात आले.

अभियानाचा संदेश घरोघरी पोहोचवण्यासाठी सेवा ज्योत यात्रेचे आयोजन करण्यात आले. ग्रामस्थांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी मोफत तपासणी व सल्ला शिबिर आयोजित करण्यात आले. सेवा सेतू अभियान (दाखले व प्रमाणपत्रे वाटप): नागरिकांना आवश्यक असणारे विविध शासकीय दाखले आणि प्रमाणपत्रांचे तात्काळ वाटप करण्यात आले.

अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुधीर ठोंबरे यांनी या सर्व उपक्रमांची पाहणी करून समाधान व्यक्त केले. शासकीय योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्यासाठी ग्रामपंचायतीने पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. या प्रसंगी ग्रामपंचायत मौजे वसईचे प्रशासक, ग्रामपंचायत अधिकारी, तसेच पंचायत समिती औंढा नागनाथचे सहाय्यक गटविकास अधिकारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**हिंगोली- औंढा नागनाथ तालुक्यातील वसई येथे सेवा संकल्प अभियानांतर्गत विविध उपक्रम व मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ सुधीर ठोंबरे, गटविकास अधिकारी, सरपंच यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. छाया- विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### सेवा संकल्प अभियानांतर्गत विविध उपक्रम



हिंगोली- सेवा संकल्प अभियानांतर्गत 'सेवा माझे योगदान' या उपक्रमाच्या माध्यमातून औंढा नागनाथ तालुक्यातील ग्रामपंचायत निशाणा येथे विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) श्रीमती समृद्धी दिवाणे यांच्या उपस्थितीत स्वच्छता ही सेवा, प्लास्टिकमुक्त गाव, वृक्षारोपण, आरोग्य तपासणी तसेच सुशासन व नागरिक सेवा उपक्रम राबविण्यात आले. यावेळी ग्रामस्थांना प्लास्टिकमुक्त गाव अभियानांतर्गत प्लास्टिक कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन, प्लास्टिकचा वापर टाळण्याचे महत्त्व आणि स्वच्छतेबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच गाव परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. नागरिकांसाठी आरोग्य तपासणी उपक्रमही राबविण्यात आला.

### आज जिल्ह्यात माहीती अधिकार दिन

हिंगोली- माहितीचा अधिकार अधिनियमाबाबत नागरिकांमध्ये व्यापक जनजागृती व्हावी आणि नागरिकांना त्यांच्या माहितीच्या अधिकाराची प्रभावीपणे जाणीव व्हावी, यासाठी सोमवार, दि. २८ सप्टेंबर २०२६ रोजी 'माहिती अधिकार दिन' साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्त जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालये, शैक्षणिक संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था तसेच संबंधित संस्थांनी विविध जनजागृतीपर उपक्रम राबवावेत, असे निर्देश विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी दिले आहेत. राज्य शासनाच्या दि. २० सप्टेंबर २००८ रोजीच्या शासन निर्णयानुसार दरवर्षी २८ सप्टेंबर हा दिवस राज्य पातळीवर 'माहिती अधिकार दिन' म्हणून साजरा करण्यात येतो. माहितीच्या अधिकाराबाबत समाजात व्यापक प्रमाणात जनजागृती करण्याच्या उद्देशाने दि. २८ सप्टेंबर २००८ पासून या उपक्रमास सुरुवात करण्यात आली आहे.

### ग्रामीण पोलिसांतर्फे गणपती विसर्जन

हिंगोली- हिंगोली ग्रामीण पोलिस ठाण्याच्यावतीने मोठ्या उत्साहात गणपतीचे विसर्जन करण्यात आले. यावेळी पोनि विष्णुकांत गुठ्ठे यांच्यासह अधिकारी व कर्मचारी यांनी विसर्जन मिरवणुकीत सहभाग घेतला होता.



# माझं गाव आरोग्य संपन्न गाव अभियानात उत्कृष्ट कामगिरी करा- सीइओ विवेक गायकवाड



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २७ सप्टेंबर**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान आणि स्मार्ट ग्राम म्हणून ओळख निर्माण केलेल्या ब्रह्मपुरी गावाने 'माझं गाव, आरोग्य संपन्न गाव' अभियानातही उत्कृष्ट कामगिरी करावी. राज्यस्तरीय पुरस्कार मिळविण्यासाठी आरोग्य विभाग आणि ग्रामपंचायत प्रशासनाने समन्वयाने काम करावे, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांनी केले.

स्वच्छ भारत मिशनअंतर्गत 'स्वच्छता ही सेवा' अभियान आणि विशेष प्लास्टिकमुक्त गाव मोहिमेच्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांनी आज हिंगोली तालुक्यातील ब्रह्मपुरी ग्रामपंचायतीला भेट देऊन विविध विकासकामांच्या अंमलबजावणीचा प्रत्यक्ष आढावा घेतला. यावेळी १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या 'सेवा संकल्प अभियानांतर्गत' ग्रामस्थांना शासनाकडून देण्यात येणाऱ्या सुविधांबाबत माहिती देण्यात आली. तसेच ग्रामस्थांच्या सहभागातून प्लास्टिक कचरा संकलन मोहीम राबवून गाव प्लास्टिकमुक्त करण्याचा निर्धार करण्यात आला.

मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाभरात प्लास्टिकमुक्त गाव मोहीम राबविण्यात येत आहे. ब्रह्मपुरी येथे त्यांनी 'माझं गाव, आरोग्य संपन्न गाव' अभियान, आयुष्मान भारत कार्ड नोंदणी, प्लास्टिकमुक्त भारत अभियान तसेच ग्रामपंचायत स्तरावरील विविध विकास कामांच्या अंमलबजावणीची माहिती घेतली. उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांना अभियान प्रभावीपणे राबविण्यासाठी आवश्यक सूचना व मार्गदर्शन केले.

ग्रामपंचायतीच्या आढाव्यानंतर गायकवाड यांनी अंगणवाडीला भेट देऊन बालकांच्या शैक्षणिक गुणवत्तेची पाहणी केली. लहान वयातच मुलांना अक्षरांची प्राथमिक ओळख होणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. त्यानंतर जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला भेट देऊन त्यांनी सुमारे एक तास विद्यार्थ्यांशी संवाद साधला. शिक्षकाची भूमिका घेत पहिलीच्या विद्यार्थ्यांना मराठी वर्णाक्षरांचे इंग्रजीतील रूपांतर करून बाराखडी सोप्या व रंजक पद्धतीने शिकविली.

यावेळी सरपंच शीतल घनगाव, उपसरपंच शिवकन्या तावरे, विस्तार अधिकारी विष्णू भोंजे, डॉ. पांडुरंग भुरके, गजानन राऊत, आरोग्य कर्मचारी, आरोग्य सेविका आदींची उपस्थिती होती.

# महसूल मंत्री चंद्रशेखर बानवकुळेंचा आज दौरा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २७ सप्टेंबर**

राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे सोमवार, दि. २८ सप्टेंबर २०२६ रोजी हिंगोली जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. या दौऱ्यात ते दुष्काळग्रस्त भागातील पीक पाहणी व नागरिकांचे निवेदने स्विकारतील. सोमवार २८ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १० वा. मोटारीने उमरखेड येथून वारंगा फाटा मार्गे मौजा अराठी जि. हिंगोली येथे आगमन. सकाळी ११ वा. दुष्काळग्रस्त भागाचा पाहणी दौरा. स्थळ:- मौजा अराठी ता. कळमनुरी जि. हिंगोली. सकाळी ११.४५ वा. मोटारीने मौजा अराठी येथून कळमनुरी मार्गे सा. बां. विभाग विश्रामगृह हिंगोली कडे प्रयाण. सकाळी १२ ते १ वाजेपर्यंत नागरीकांचे निवेदन स्विकारण्यासाठी राखीव. स्थळ :- शासकीय विश्रामगृह सार्वजनिक बांधकाम विभाग, हिंगोली. दुपारी १ वा. मोटारीने हिंगोली येथून कळमनुरी-डोंगरकडा मार्ग अर्धापूर जि. नांदेड कडे प्रयाण करतील.

# महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्यावतीने गुरू गौरव सोहळा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली २७ सप्टेंबर**

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती जिल्हा शाखा हिंगोली.च्या वतीने गुरु गौरव आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण सोहळा व जिल्हास्तरीय अधिवेशन -२०२६ चा कार्यक्रम शहरातील कै.शिवाजीराव देशमुख सभागृहात आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्रा उदय शिंदे, तर उद्घाटक म्हणून खासदार रामराव वडकुते, प्रमुख पाहुणे म्हणून.जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, विजय कोबे, राजन कोरगावकर, हिंगोली जिल्हा काँग्रेस कमिटीचे माजी जिल्हाध्यक्ष सुरेश सराफ, माजी शिक्षण सभापती संजय भैय्या देशमुख, भाजपा कार्याध्यक्ष पवन उपाध्याय, पंडित नागरगोजे, विजय राठोड, व्ही.डी. देशमुख यांच्या सह इतर मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमात खासदार रामराव वडकुते व सी ई ओ. विवेक गायकवाड यांच्या हस्ते शिक्षकांना सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र गौरविण्यात आले. १०० शिक्षकांना गुरू गौरव आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आले.

# सेवा संकल्प अभियानांतर्गत कुंभारवाडी येथे मोफत नेत्रदान शिबीर



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २७ सप्टेंबर**

सेवासंकल्प कार्यक्रमांतर्गत कळमनुरी तालुक्यातील कुंभारवाडी येथे नागरिकांसाठी नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात गावातील नागरिकांची नेत्र तपासणी करून त्यांच्या डोळ्यांच्या आरोग्याबाबत आवश्यक मार्गदर्शन करण्यात आले.

या नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन कृष्णकांत शेवळकर यांच्या पुढाकारातून करण्यात आले. ग्रामीण भागातील नागरिकांना वेळेवर नेत्रसेवा मिळावी आणि नेत्रविकारांचे लवकर निदान व्हावे, हा या उपक्रमाचा उद्देश होता. यावेळी भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष मा. गजाननदादा घुगे, संजय कावडे, सुरेशराव नागरे, प्रकाश काका नाईक, बाळासाहेब नाईक, रुखमाराव शिंदे, विठ्ठल भोयर, ओंकार नावडे, शशिकांत वडकुते तसेच इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भोईर यांनी केले. तसेच केंद्रप्रमुख नवनाथ आमले यांची उपस्थिती लाभली. नागरिकांनी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. ग्रामीण भागातील नागरिकांना आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी अशा सेवाभावी उपक्रमांचे आयोजन सातत्याने करण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन कृष्णकांत शेवळकर यांनी केले होते.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

# दुष्काळी परिस्थितीत पालकमंत्र्यांची शेतकऱ्यांच्या बांधावर धाव

**तभा वृत्तसेवा**
**नरसी, दि. २७ सप्टेंबर -**

पावसाने ओढ दिल्याने खरीप हंगामातील पिके अडचणीत आली असून शेतकऱ्यांसमोर उत्पादनाची चिंता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. अतुल सावे यांनी रविवारी दि. २७ रोजी नायगाव तालुक्यातील पळसगाव शिवारात प्रत्यक्ष शेताच्या बांधावर जाऊन दुष्काळी परिस्थितीची पाहणी केली. सोयाबीन पिकांची स्थिती जाणून घेत त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी समजून घेतल्या.

पळसगाव शिवारातील सोयाबीनच्या शेतात पाहणी करताना पावसातील खंडामुळे पिकांवर झालेला परिणाम, उत्पादनाची स्थिती तसेच शेतकऱ्यांच्या अडचणींबाबत पालकमंत्री सावे यांनी माहिती घेतली. संकटाच्या काळात शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी असल्याचे सांगत परिस्थितीचा वस्तुनिष्ठ आढावा घेण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना करण्यात आल्या.



यावेळी आमदार राजेश पवार, भाजपा जिल्हाध्यक्ष संतुकराव हंबर्डे, चैतन्य बापू देशमुख, जिल्हाधिकारी राहुल कर्डीले, मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील, माजी जि.प. सदस्य बालाजी बचेवार, माजी सभापती श्रावण पाटील भिलवंडे, रणजित कुरे, श्रीहरी देशमुख यांच्यासह शेतकरी व कार्यकर्ते उपस्थित होते.

**तुप्पा येथे चारा छावणीची मागणी**

पालकमंत्री सावे यांनी नांदेडजवळील तुप्पा येथील शिवारातही दुष्काळी परिस्थितीची पाहणी केली. यावेळी शेतकऱ्यांनी पिकांसोबतच पशुधनाच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर होत असल्याचे निदर्शनास आणून देत चारा छावणी सुरू करण्याची मागणी केली. पावसाची स्थिती अशीच राहिल्यास जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न अधिक तीव्र होण्याची शक्यता शेतकऱ्यांनी व्यक्त केली. यावेळी तुप्पा येथील पाहणीवेळी आमदार आनंदराव बोडांरकर, माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा यांच्यासह स्थानिक कार्यकर्ते व शेतकरी उपस्थित होते.

**शेतकऱ्यांच्या नजरा आता मदतीकडे**

दुष्काळी परिस्थितीची पाहणी करण्यासाठी पालकमंत्र्यांनी थेट शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचल्याने शेतकऱ्यांनी आपल्या समस्या मांडल्या. मात्र, केवळ पाहणी न होता पिकांचे नुकसान, पाणीटंचाई आणि पशुधनाच्या चाऱ्याचा प्रश्न लक्षात घेऊन शासनाकडून तातडीने ठोस मदत मिळावी, अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करीत आहेत.

# दुष्काळाच्या संकटात शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे : पालकमंत्री अतुल सावे

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. २७ सप्टेंबर -**

राज्यात दुष्काळ जाहीर करण्यात आला असून, या संकटाच्या काळात शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. शेतकऱ्यांनी काळजी करू नये, शासनाकडून सर्वतोपरी मदत केली जाईल, अशी ग्वाही राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपरिक ऊर्जा, दिव्यांग कल्याण मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांनी आज दिली.

पालकमंत्री अतुल सावे यांनी आज हदगाव तालुक्यातील जगापूर व तामसा, भोकर तालुक्यातील हळदा व मोघाळी, उमरी तालुक्यातील सोमठाणा, नायगाव तालुक्यातील पळसगाव आणि नांदेड तालुक्यातील तुप्पा येथे भेट देऊन पीक परिस्थितीची पाहणी केली. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांशी, विशेषतः महिला शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी व व्यथा जाणून घेतल्या.

राज्य शासन या संकटात शेतकऱ्यांसोबत असून, त्यांना सर्वतोपरी मदत केली जाईल. शेतकऱ्यांनी खचून जाऊ नये, शासन त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे, असा धीर देत पालकमंत्री सावे यांनी शेतकऱ्यांना दिलासा दिला.



तसेच, सर्व पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळेपर्यंत कर्जमाफीची प्रक्रिया सुरू राहणार असल्याचेही श्री. सावे यांनी यावेळी स्पष्ट केले.

जिल्ह्यातील उर्वरित दोन तालुक्यांचाही ट्रिगर-२ अंतर्गत दुष्काळग्रस्त यादीत समावेश करण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्याशी चर्चा करून अहवाल घेतला असून, या दोन्ही तालुक्यांचाही समावेश केला जाईल, असा विश्वास पालकमंत्री अतुल सावे यांनी व्यक्त केला.

या पाहणी दौऱ्यात जगापूर व सोमठाणा येथे आमदार बाबूराव कदम कोहळीकर, हळदा व मोघाळी येथे खासदार अशोकराव चव्हाण व आमदार श्रीजया चव्हाण, पळसगाव येथे आमदार राजेश पवार, तर तुप्पा येथे आमदार आनंदराव तिडके-बोंढारकर उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत यांच्यासह संबंधित तालुक्यांचे उपविभागीय अधिकारी, तहसीलदार व तालुका कृषी अधिकारी उपस्थित होते. या पीक परिस्थिती पाहणी दौऱ्यावेळी संबंधित गाव परिसरातील शेतकरी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राजवाडी येथे गणरायाला भक्तिमय वातावरणात निरोप

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड, दि. २७ सप्टेंबर -**

मुदखेड तालुक्यातील राजवाडी येथे अनंत चतुर्दशीच्या पावन मुहूर्तावर श्री गणरायाला वाजत-गाजत आणि भक्तिमय वातावरणात निरोप देण्यात आला. 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या'च्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. यावेळी ग्रामस्थांसह गणेशभक्त मोठ्या संख्येने विसर्जन मिरवणुकीत सहभागी झाले होते.

राजवाडी येथे 'एक गाव, एक गणपती' या संकल्पनेतून श्री शिवा गणेश मंडळाच्या



वतीने गणेशोत्सव साजरा करण्यात आला. अकरा दिवसांच्या या गणेशोत्सवात मंडळाच्या वतीने विविध सामाजिक व धार्मिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये विशेषतः रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला ग्रामस्थ व गणेशभक्तांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. तसेच गणेशभक्तांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

गणेशोत्सवाच्या काळात सामाजिक बांधिलकी जपत विविध उपक्रम राबविल्याबद्दल मंडळाचे ग्रामस्थांकडून कौतुक करण्यात आले. अनंत चतुर्दशीच्या दिवशी गणरायाची विधिवत पूजा-अर्चा करून विसर्जन मिरवणुकीला सुरुवात झाली. ढोल-ताशांचा गजर, फुलांची उधळण आणि 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषात गणरायाला भावपूर्ण निरोप देण्यात आला.

या गणेशोत्सवाच्या आयोजनासाठी सरपंच प्रतिनिधी आनंदा गुंजकर यांच्यासह श्री शिवा गणेश मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी व ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.

श्री शिवा गणेश मंडळाचे अध्यक्ष अनिल बाबुराव शेटे, उपाध्यक्ष आनंदा रंगराव गुंजकर, कोषाध्यक्ष देवानंद महाद्वार,संतोष बल्फेवाड,

पोलिस पाटील नितिन जोंधळे, गोविंद जोंधळे, चैतन शेटे, योगेश शेटे, परमानंद शेटे, दत्ता कोंडेवाड, नारायण राचेवाड, नागोराव बैनवाड, सोमनाथ शेटे, यांच्यासह मंडळाचे सदस्य आणि ग्रामस्थांनी गणेशोत्सव यशस्वी करण्यासाठी सहकार्य केले.

# देगलूरात कन्याकुमारी-काश्मीर पदयात्री काटूरी व्यंकटेशवारलू यांचे जंगी स्वागत

**तभा वृत्तसेवा**
**देगलूर, दि. २७ सप्टेंबर -**

राहुल गांधी यांच्या भारत जोडो यात्रेपासून प्रेरणा घेत देशात एकोपा, सामाजिक सलोखा आणि बंधुभावाचा संदेश पोहोचविण्याच्या उद्देशाने कन्याकुमारी ते काश्मीर असा पायी प्रवास करणारे आंध्र प्रदेशातील युवा नेते तथा हैदराबाद उच्च न्यायालयातील वकील काटूरी व्यंकटेशवारलू यांचे देगलूर शहरात काँग्रेसच्या शहर व ग्रामीण पदाधिकाऱ्यांच्या वतीने उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले.

कन्याकुमारी येथून सुरू झालेल्या पदयात्रेचा प्रवास करत व्यंकटेशवारलू देगलूर येथे दाखल झाले. त्यांच्या आगमनाची माहिती मिळताच काँग्रेसचे पदाधिकारी, नगरसेवक, कार्यकर्ते तसेच नागरिकांनी एकत्र येत त्यांचे पुष्पहार घालून स्वागत केले. यावेळी त्यांच्या पुढील काश्मीरपर्यंतच्या पायी प्रवासासाठी उपस्थितांनी शुभेच्छा दिल्या.

या पदयात्रेमागील भूमिका आणि उद्देश यावेळी उपस्थित मान्यवरांनी स्पष्ट केला. देशाच्या विविध भागांतून पायी प्रवास करत नागरिकांशी संवाद साधणे, सामाजिक सलोखा आणि बंधुभावाचा संदेश पोहोचविणे तसेच समाजातील विविध घटकांना एकत्र आणण्याचा प्रयत्न या उपक्रमातून केला जात असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

यावेळी डॉ. पूजा सचिन गायकवाड



यांनी या उपक्रमाचे कौतुक करत पदयात्री व्यंकटेशवारलू यांना पुढील प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या. डॉ. पुजा गायकवाड म्हणाल्या की, ज्याप्रकारे राहुल गांधी यांनी भारत जोडो यात्रेतुन संपुर्ण देशाला जोडण्याचे काम केले. भारत जोडो यात्रेची प्रेरणा घेत वकील काटूरी व्यंकटेशवारलू यांनी देशीत एकोपा, सामाजिक सलोखा आणि बंधुभावाचा संदेश देण्याचा प्रयत्न करीत आहेत. डॉ. पुजा गायकवाड या प्रवासासाठी देगलूरकरांच्या वतीने शुभेच्छा दिल्या.तसेच कैलास येसगे, नगरसेवक शत्रुघ्न वाघमारे आदींनी मनोगत व्यक्त केले.

या स्वागत कार्यक्रमास काँग्रेसचे नगरसेवक शत्रुघ्न वाघमारे, नगरसेवक मिरामयोद्दीन, बालाजी पाटील थडके, कैलास येसगे, राजा कांबळे, डॉ. पूजा गायकवाड, जियाभाई यांच्यासह काँग्रेसचे शहर व ग्रामीण भागातील पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. देगलूरमधील स्वागतानंतर त्यांनी पुढील प्रवासाला सुरुवात केली.

## काँग्रेसच्या ओबीसी नांदेड महानगर जिल्हाध्यक्षपदी विनोद कांचनगिरे


**नवीन नांदेड**-काँग्रेस (आय) ओबीसी महानगर नांदेड जिल्हाध्यक्ष पदी विनोद कांचनगिरे यांच्यी नियुक्ती काँग्रेस आय पक्षाच्या वतीने डॉ.अनिल जयहिंद यांनी नियुक्ती पत्राद्वारे केली आहे. सिडको हाडको परिसरासह पूर्ण नांदेड जिल्ह्यातील सामाजिक, राजकीय, धार्मिक कार्याची दखल घेऊन काँग्रेस पक्षाच्या वतीने डॉ.अनिल जयहिंद



यांनी नियुक्ती पत्राद्वारे दिनांक २३ सप्टेंबर २०२६ रोजी विनोद माधवराव कांचनगिरे यांची निवड करण्यात आली आहे. विनोद कांचनगिरे यांनी राजकारणाची अपेक्षा न करता समाजकारणावर भर देऊन त्यांनी परिसरातील व जिल्ह्यात विविध विकासात्मक आंदोलने करून नागरिकांच्या प्रलंबित प्रश्नांसाठी शासन दरबारी कायदेशीर मागणी करून सामान्य नागरिकांचे प्रश्न सोडविण्यात ते नेहमी अग्रेसर असायचे. त्याचबरोबर पक्षाच्या विविध बैठीका घेऊन पक्षवाढीसाठी व पक्षाच्या हितासाठी अहोरात्र प्रयत्न करीत असतात. म्हणून त्यांची वरिष्ठांकडे त्यांच्या कार्याची नेहमीच नोंद राहिलेली आहे. यापूर्वी त्यांनी काँग्रेस आय ब्लॉक अध्यक्ष दोन वेळेस, नांदेड दक्षिण काँग्रेस अध्यक्ष, ओबीसी अध्यक्ष यासह विविध पदे भुषविले आहेत. या त्यांच्या निष्ठावंत कार्याची दखल घेऊन जिल्ह्याचे खासदार रविंद्र चव्हाण, ओबीसी सेलचे महाराष्ट्र अध्यक्ष प्रा.यशपाल भिंगे , दक्षिण महानगर अध्यक्ष अब्दुल गफार,ऊतर काँग्रेस आयचे अध्यक्ष विठ्ठल पावडे, सुरेंद्र घोडेजकर, माजी उपमहापौर आनंद चव्हाण, डॉ.चव्हाण यांनी केलेल्या शिफारशी वरून त्यांची नांदेड ओबीसी काँग्रेस महानगर अध्यक्षपदी विनोद माधवराव कांचनगिरे यांच्यी नियुक्ती करण्यात आली आहे.या निवडीबद्दल बापू साहेब पाटील,ज्योती कदम, प्रा.गजानन मोरे,दिपक सिंग हुजुरीया,संजय वाघमारे ,शेख लतीफ,शेख नुरोद्दीन,शेख हुसेन ,कविता चव्हाण, सुदर्शन कांचनगिरे, संतोषी भाले, रामकिशन इंदुरकर, देविदास कदम, सौ.कौशल्या तेलंग,गोरगे अप्पा ,सोनवळे अप्पा,मुकनवार,बारोळे अप्पा यांच्यासह भीम कायदा संघटनेचे जिल्हा अध्यक्ष विलास गजभारे यांनी अभिनंदन केले आहे.

## कवी डी. एन. मोरे यांना 'अण्णाभाऊ साठे कविरत्न' पुरस्कार जाहीर

**बाऱ्हाळी**- पुणे येथे होत असलेल्या शंभराव्या राज्यस्तरीय मराठी काव्य संमेलन २०२६ मध्ये कवी डी. एन. मोरे खैरकेकर यांची 'साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे कविरत्न' पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. पुरस्काराचे वितरण रविवार दि. २७ सप्टेंबर २०२६ रोजी पुणे येथील महात्मा फुले सांस्कृतिक भवन येथे आयोजित करण्यात आले आहे. साहित्य व काव्य क्षेत्रातील



त्यांच्या संघर्षमय व प्रेरणादायी योगदानाची दखल घेऊन ही निवड करण्यात आली आहे. नांदेड पोलिस दलातील सेवानिवृत्त सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक तथा मुखेड तालुक्यातील खैरका येथील मूळचे रहिवासी कवी डी. एन. मोरे यांच्या लेखणीतून वंचितांचा हुंकार आणि लोककलेचा जागर सातत्याने व्यक्त होत असतो. त्यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचा व साहित्यिक वारसाचा जागर आपल्या कवितेतून व्यक्त केलेला आहे. त्यांच्या या साहित्यिक योगदानाची दखल विविध साहित्य संमेलने व कवी संमेलनांतून घेण्यात आली आहे. आकाशवाणी नांदेडवरून त्यांच्या नऊ कवितांचे १५ मिनिटांचे प्रसारण झाले असून त्यानंतर आकाशवाणीच्या वतीने शुभेच्छापत्र व धनादेश देऊन त्यांचा गौरव करण्यात आला आहे. सामाजिक कार्यासोबतच साहित्य व काव्य क्षेत्रात त्यांनी केलेल्या उल्लेखनीय योगदानाची दखल घेऊन रानकवी प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्याचे संस्थापक अध्यक्ष रानकवी जगदीप वनशिव आणि ज्ञानाई फाऊंडेशन पुणेचे संस्थापक अध्यक्ष लोककवी सीताराम नरके यांनी निवडपत्राद्वारे कवी डी. एन. मोरे यांना पुरस्कारासाठी निवड झाल्याचे कळविले आहे. या निवडीबद्दल साहित्य क्षेत्रातील मित्रपरिवार, आप्तेष्ट, पत्रकार व परिवारातील सदस्यांकडून अभिनंदन होत आहे.

## भारतात 'हवामान कायदा' झिरो ड्राफ्ट तयार ; खा. डॉ. अजित गोपछडे यांच्या संसदीय पाठपुराव्याला यश

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. २७ सप्टेंबर -**

भारतातील हवामानशास्त्रीय सेवांना स्पष्ट आणि बळकट कायदेशीर चौकट देण्यासाठी केंद्र सरकारने पुढाकार घेतला असून, पृथ्वी विज्ञान मंत्रालयाच्या विशेष समितीने प्रस्तावित हवामान कायद्याचा 'झिरो ड्राफ्ट' तयार केला आहे. राज्यसभेचे खासदार डॉ. अजित गोपछडे यांनी संसदेत उपस्थित केलेल्या प्रश्नानंतर या प्रक्रियेला गती मिळाली. संसदीय आश्वासनानुसार जुलै २०२७ पर्यंत पुढील प्रक्रिया पूर्ण करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे.



मराठवाड्यात यंदा पावसातील खंड आणि पर्जन्यमानातील अनिश्चिततेमुळे शेतीसमोर निर्माण झालेली दुष्काळी परिस्थिती हवामानाच्या अचूक अंदाजाचे महत्त्व अधोरेखित करणारी ठरत आहे. पावसाचे बदलते स्वरूप, दीर्घ कोरडे कालखंड आणि तापमानातील वाढ यांचा शेती व जलसाठ्यांवर परिणाम होतो. त्यामुळे हवामानातील बदलांचा वेध घेऊन त्याची अचूक पूर्वसूचना मिळणे दुष्काळासारख्या परिस्थितीच्या व्यवस्थापनासाठी महत्त्वाचे ठरते. हवामान नोंदींमध्ये मराठवाड्यासाठी उष्णतेच्या लाटांसह विविध हवामानविषयक स्थितींच्या पूर्वसूचनाही देण्यात येतात.

२४ जुलै २०२५ रोजी राज्यसभेत खा. डॉ. अजित गोपछडे यांनी हवामान सेवांसाठी स्वतंत्र कायदेशीर चौकटीची आवश्यकता मांडली होती. यावेळी त्यांनी विविध देशांतील हवामान कायद्यांचा अभ्यास, हवामान क्षेत्रासाठी कुशल मनुष्यबळ उपलब्ध करणे तसेच आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने स्थानिक हवामान अंदाज अधिक अचूक करण्यासाठी संशोधनाला चालना देण्याची गरज अधोरेखित केली होती.

या प्रश्नाला उत्तर देताना केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञान तथा पृथ्वी विज्ञान राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी मंत्रालयाने विधी विभागासह संबंधित संस्थांच्या प्रतिनिधींची उच्चस्तरीय समिती स्थापन केल्याचे सांगितले होते.

## इराणच्या समर्थनार्थ १ ऑक्टोबरला मुंबईत मोर्चा; झाकेर चाऊस यांचे सहभागी होण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. २७ सप्टेंबर -**



इराणच्या समर्थनार्थ तसेच केंद्र सरकारच्या परराष्ट्र धोरणाविरोधात वंचित बहुजन आघाडीच्या वतीने १ ऑक्टोबर २०२६ रोजी मुंबईतील CSMT रेल्वे स्थानक येथे मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. वंचित बहुजन आघाडीचे नेते तथा सामाजिक कार्यकर्ते झाकेर चाऊस यांनी महाराष्ट्रातील नागरिकांसह मुस्लिम समाजाने मोठ्या संख्येने या मोर्चात सहभागी व्हावे, असे आवाहन केले आहे.

भारत आणि इराणचे जुने संबंध असून, सध्याच्या परिस्थितीत भारताने इराणच्या पाठीशी उभे राहावे, अशी भूमिका या मोर्चाच्या माध्यमातून मांडण्यात येणार असल्याचे झाकेर चाऊस यांनी सांगितले. केंद्र सरकारच्या परराष्ट्र धोरणाविरोधातही यावेळी आवाज उठविण्यात येणार आहे.

ॲड. प्रकाश बाळासाहेब आंबेडकर हे सामाजिक न्याय, वंचित घटकांचे प्रश्न आणि मुस्लिम समाजाच्या विविध प्रश्नांवर सातत्याने आवाज उठविणारे नेते असल्याचे झाकेर चाऊस यांनी म्हटले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली मुंबईत होणाऱ्या या कार्यक्रमाला मोठे महत्त्व असल्याचे सांगत त्यांनी युवक, सामाजिक कार्यकर्ते, मौलाना, हाफिज, कारी, मशिदींचे इमाम तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन केले आहे.

मोर्चाचा संदेश मशिदी, मदरसे आणि मुस्लिम वस्त्यांपर्यंत पोहोचवून महाराष्ट्रातून मोठ्या संख्येने नागरिकांनी मुंबईत उपस्थित राहावे, अशी विनंतीही झाकेर चाऊस यांनी केली आहे.



**मुदखेड- तालुक्यात पाऊस अत्यल्प प्रमाणात झाला असून खरीप पिके हातची गेली असतानाही दुष्काळग्रस्त तालुक्यांच्या यादीत मुदखेडचा समावेश नसल्याने काँग्रेसने आक्रमक भूमिका घेत शासनाच्या निषेधार्थ यलगार पुकारला असून जीआरची होळी करत शासनाच्या विरोधात तीव्र आंदोलन छेडले आहे.**

# नरसीत भक्तिभावाने लाडक्या लंबोदराला भावपूर्ण निरोप

**तभा वृत्तसेवा**
**नायगाव, दि. २७ सप्टेंबर -**

'गणपती बाप्पा मोरया... पुढच्या वर्षी लवकर या...'च्या जयघोषात, ढोल-ताशांच्या गजरात आणि हजारो गणेश भक्तांच्या उपस्थितीत नरसी नगरीतील लाडक्या लंबोदर गणरायाला भावपूर्ण निरोप देण्यात आला. भक्तिभाव, उत्साह आणि सामाजिक एकात्मतेचे दर्शन घडविणारी 'लंबोदर' गणेश मंडळाची विसर्जन मिरवणूक नरसी करांच्या विशेष आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरले होते.

नरसीसह परिसरातील तरुणांमध्ये क्रीडा क्षेत्राची आवड निर्माण करून अनेक युवकांना क्रीडा विश्वात आपले भविष्य घडविण्याची प्रेरणा देणारे कै. माधवराव भिलवंडे यांच्या स्मृतींना उजाळा देत 'लंबोदर' गणेश मंडळाने यंदाही गणरायाची भव्य मिरवणूक काढली. आकर्षक विद्युत



रोषणाई, विविध देखावे आणि पारंपरिक वाद्यांच्या गजराने सजलेली ही मिरवणूक पाहण्यासाठी नरसीसह परिसरातील गणेशभक्तांनी मोठी गर्दी केली होती.

कै. माधवराव भिलवंडे यांनी नरसी नगरीत अनेक वर्षे क्रिकेटच्या माध्यमातून तरुणांमधील क्रीडागुणांना प्रोत्साहन दिले. त्यांच्या कार्याची आठवण जपण्याचे काम 'लंबोदर' गणेश मंडळाकडून दरवर्षी विविध उपक्रमांच्या माध्यमातून केले जात आहे. त्यामुळे यंदाच्या मिरवणुकीलाही त्यांच्या स्मृतींची भावनिक किनार लाभली.

दरम्यान, नायगाव तालुक्यातील नरसी येथील विविध गणेश मंडळांच्या विसर्जनस्थळांची पाहणी करण्यासाठी नायगावच्या तहसीलदार डॉ. सौ. धम्मप्रिया गायकवाड यांनी निवडक कर्मचाऱ्यांसह प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. यावेळी नरसीतील गणेश मंडळांच्या महिला पदाधिकाऱ्यांच्या वतीने नरसी चौकात तहसीलदार डॉ. गायकवाड यांचा शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन सन्मान करण्यात आला.

नरसीतील विविध गणेश मंडळांच्या भव्य मिरवणुका नरसी चौकात दाखल होत असताना भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.यावेळी रामतीर्थचे सपोनी विक्रम हराळे, पोलीस पाटीलइब्राहिमबेगपटेल,शिवसेना(उबाठा) गटाचे तालुका प्रमुख रवींद्र भिलवंडे,दैनिक मराठी वर्तमानपत्राचे मा.तालुकाध्यक्ष गंगाधर भिलवंडे, तालुकाध्यक्ष लक्ष्मण बर्गे, उपाध्यक्ष गोविंद टोकलवाड, गंगाधर गंगासागरे, दिलीप वाघमारे, तानाजी शेळगांवकर, 'दैनिक तरुण भारत'चे तालुका प्रतिनिधी आनंदराव सूर्यवंशी, गणेश कंदूर्के यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते 'लंबोदर' गणेश मंडळाच्या श्रींची विधिवत पूजा व आरती करण्यात आली.

विसर्जन मिरवणुकीदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी रामतीर्थचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विक्रम हनुमंतराव हराळे यांच्या मार्गदर्शनाखाली नियोजनबद्ध पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. प्रशासन, पोलीस यंत्रणा, गणेश मंडळांचे पदाधिकारी आणि गणेशभक्त यांच्या सहकार्यामुळे नरसीसह नायगांव तालुक्यातील विविध गणेश मंडळांचे विसर्जन शांततेत व भक्तिमय वातावरणात पार पडले.

अखेर विसर्जनस्थळी 'गणपती बाप्पा मोरया... पुढच्या वर्षी लवकर या...'चा जयघोष आसमंतात घुमला आणि भक्तांच्या डोळ्यांत भावूकता दाटून आली. श्रद्धेने पूजलेल्या आपल्या लाडक्या गणरायाला निरोप देताना नरसीकरांनी भक्ती, संस्कृती, सामाजिक सलोखा आणि शांततेची परंपरा जपली. 'बाप्पा, पुढच्या वर्षी पुन्हा याच उत्साहाने या',अशी भावनिक साद घालत गणेशभक्तांनी लाडक्या लंबोदराला निरोप दिला.